# धर्म-कर्म-विज्ञान



# धर्म, कर्म आणि विज्ञान

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालय
पांडव भवन, माऊंट आबू, राजस्थान

परमपिता शिव परमात्म्याने प्रजापिता ब्रह्माद्वारे
जे ज्ञान दिले त्या आधारे लिहिले गेलेले
निबंध या पुस्तकात संग्रहीत
करण्यात आले आहेत.

लेखक : ब्रह्माकुमार जगदीशचन्द्र

प्रकाशक : मराठी साहित्य विभाग
प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालय
'इन्द्रप्रस्थ', ८-अ, वसंत नगर, नागपूर-४४० ०२२
☎ २४६७९३, २२५७४६, २४५१७८

# अनुक्रमणिका


| क्रम | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| | भूमिका | १ |
| १. | धर्म व कर्म | २ |
| २. | धर्म आणि विज्ञान (भाग १) | ११ |
| ३. | परमाणु-शक्ती विरुद्ध परमात्मिक शक्ती | १८ |
| ४. | औद्योगिक व राजकीय क्रांती आणि शांती | २१ |
| ५. | योग, विज्ञान आणि मनोविज्ञान | २५ |
| ६. | धर्म आणि विज्ञान (भाग २) | ३० |
| ७. | धर्म आणि अध्यात्म यांचे स्वरूप व समभावना | ३५ |
| ८. | जग उन्नतीच्या दिशेने जात आहे की अवनतीच्या दिशेने ? | ४३ |
| ९. | माणूस चंद्रावर कसा पोहोचला ? चंद्राविषयी विचित्र समजुती | ४९ |
| १०. | विज्ञान हे ईश्वरी ज्ञानाचे समर्थक व सहाय्यक आहे की त्याला विरोध करणारे व बाधक आहे | ५६ |
| ११. | परमात्मा काय देतो व विज्ञान काय देते ? | ६२ |
| १२. | धर्म आणि विज्ञान यांमधील विषमता कशी दूर होईल ? | ६८ |

भूमिका

# धर्म आणि विज्ञान

**गे**ल्या शंभर वर्षात विज्ञानाचा अभूतपूर्व असा विकास झाला आहे. अनेक आश्चर्यकारक शोध विज्ञानाद्वारे लोकांपुढे आले आहेत. विज्ञानाने जे नवीन सिद्धांत प्रस्थापित केले आहेत त्यांमुळे कित्येक चिर-प्रचलित 'धार्मिक' समजुतींना मूठमाती मिळाली आहे. विज्ञानाची पद्धतीच मुळी अशी आहे की, ते बहुधा प्रयोगांद्वारेच आपले सिद्धांत प्रत्यक्ष स्वरूपात सिद्ध करू शकते. त्यामुळे विज्ञानाविषयी लोकांना अधिक आस्था वाटते आणि जेथे ते एखाद्या धार्मिक सिद्धांताविरुद्ध जाते तेथे लोक बहुधा विज्ञानाचेच मत ग्राह्य मानतात. परंतु सुख-सोईची अनेक वैज्ञानिक साधने प्राप्त होऊनही बरेचसे लोक सुखासमाधानाने झोपू शकत नाहीत असेही आपण पाहतो. याव्यतिरिक्त कित्येक उच्च कोटीच्या वैज्ञानिकांनीही धर्माची आवश्यकता मान्य केली आहे.

अशा रीतीने आज धर्म आणि विज्ञान यांविषयी लोकांचे एखादे निश्चित असे मत नाही. परंतु या उभयतांचे आपापले असे महत्त्व आहे यात काही संशय नाही. या पुस्तकात आम्ही धर्म आणि विज्ञान दोघांचेही आपापले स्थान व कर्तव्य यांचा परिचय देण्याचा प्रयत्न केला आहे. परमपिता शिव परमात्म्याने सांप्रत या उभयतांसंबंधी ज्या महावाक्यांचे उच्चारण केले त्यांच्याच आधारे प्रकाशित केले गेलेले लेख या पुस्तकात संग्रहीत करण्यात आले आहेत. वाचकांना त्यामुळे या विषयाचा बोध होईल अशी आशा आहे.

**—जगदीश**

# धर्म व कर्म

'**मा**णसाला धर्माची आवश्यकता आहे की नाही, धर्माचा कर्माशी काही संबंध आहे का, तसेच माणसाची कर्मे कशी असावीत? –' या तीन प्रश्नांवर जगात बराच काळ फारच वादविवाद होत आला आहे.

सांप्रत जगातील बराच मोठा भाग साम्यवादाने घेरलेला असून तो फारच झपाट्याने इतर देशांवरही आपला प्रभाव पाडत चालला आहे. या साम्यवादाचा जनक आणि इतिहासाकडे भौतिकवादी दृष्टिकोनातून पाहणारा कार्ल मार्क्स याचे असे म्हणणे आहे की, धर्म म्हणजे एक प्रकारची अफू आहे व ती घेतली असता लोकात अकर्मण्यता व दैववादी वृत्ती यांचा प्रादुर्भाव होतो. याउलट, ज्याने इतिहासावर कित्येक ग्रंथ लिहिले आहेत तो सुविख्यात आधुनिक इतिहासकार अर्नॉल्ड टॉयून्बी म्हणतो की, धर्मच इतिहासाच्या अग्रभागी राहिलेला आहे. गीतेच्या भगवंताने तर धर्माला एवढे महत्त्व दिले आहे की, त्याने सांगितल्याप्रमाणे धर्माच्या पुनर्स्थापनेसाठी त्याला परमधाम सोडून पृथ्वीवर स्वतः यावे लागते. तेव्हा, धर्माची लक्षणे किंवा स्वरूप याबद्दल काहीशी विषमता जरूर आहे. म्हणून प्रथम 'धर्म' म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे.

## धर्म व त्याची अंगे

**नैतिक तसेच चारित्रिक मूल्ये**

(१) माणसाचे चारित्र्य उन्नत करणे हे जगातील सर्व धर्मांचे एक मुख्य उद्दिष्ट आहे. म्हणजे आचारसंहिता हे धर्माचे एक प्रमुख अंग आहे. 'धर्म' या शब्दाचा अर्थ आहे 'धारणा'. धर्म आपल्याला जीवनासाठी काही उच्च धारणा देतो. या धारणांमुळे माणसाचे जीवन पतित होत नाही. धर्म आपल्याला दुर्गुणांपासून दूर राहण्यास शिकवितो. अशा रीतीने धर्मज्ञानाचा एक फार मोठा भाग नैतिक शिक्षण, चारित्रिक शिक्षण किंवा विधि-निषेध (Do's and Dont's) यांनी भरलेला आहे. अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य, क्रोध न करणे इत्यादींचा त्यात अंतर्भाव होतो.

प्रत्येक धर्मात यांचा उल्लेख आहे. परंतु धर्माधर्मांत यांचे तारतम्य

आढळते. उदाहरणार्थ, एक धर्म हर एक परिस्थितीत संपूर्णतया अहिंसेचे पालन करण्यास सांगतो तर दुसरा केवळ अनावश्यक हिंसा टाळण्याला 'अहिंसा' मानतो. एक धर्म अधिकात अधिक तीन वा चार विवाह करण्याची मुभा देतो परंतु परस्त्री-गमन किंवा व्यभिचाराचा निषेध करतो, यालाच तो ब्रह्मचर्य मानतो. दुसरा धर्म २५ वर्षांपर्यंत अविवाहित जीवनात कौमार्यव्रत पालनाला ब्रह्मचर्य समजतो. तिसरा, गृहस्थाश्रमी जीवनात 'एक नारी सदा ब्रह्मचारी' तत्त्व मानतो आणि चवथा ब्रह्मतत्त्वात बुद्धी स्थिर ठेवून आपली दिनचर्या व्यतीत करण्यावर भर देतो. तो या नैष्ठिक स्थितीद्वारे अखंड ब्रह्मचर्य पालन करण्यास सांगतो. त्याचे असे मत आहे की, २५ वर्षे ही जी एक आश्रमापुरतीच मर्यादा घातली गेली आहे ती आजीवन ब्रह्मचर्य पाळू न इच्छिणाऱ्या किंवा पाळू न शकणाऱ्या लोकांसाठी आहे. अन्यथा ३० वर्षे, ३६ वर्षे, ४० वर्षे आणि सर्वांत अधिक म्हणजे जन्मभर जे ब्रह्मचर्य पाळतात ते एकाहून एक महान होत. त्याचा असा सिद्धांत आहे की, मुक्ती इच्छिणाऱ्याला तर जन्मभर ब्रह्मचर्य पाळावयासच हवे. कारण याद्वारेच ओजाचा लाभ होतो,सूक्ष्म आध्यात्मिक तथ्ये बुद्धीच्या आवाक्यात येतात, आत्म-चेतस भाव (Soul-consciousness)परिपक्व होतो तसेच आत्मिक विकासाचा भक्कम पाया तयार होतो. हीच गोष्ट आचारसंबंधित अन्य नियम तसेच नैतिक मूल्य यांबाबतीतही सांगता येईल.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालय आचारसंबंधित या नियमांचा किंवा मूल्यांचा संपूर्ण (१६ कला) विकास करण्याचे, दानव बनलेल्या मानवाला देवत्व प्राप्त करण्याचे शिक्षण देते. ते व्यक्ती आणि समाज या उभयतांना यांचे पालन करण्यासाठी प्रेरणा देते व मार्गही दाखविते.

(२) बहुधा सर्व धर्मांचा आरंभ काही तात्त्विक (दार्शनिक) प्रश्न घेऊन झाला आहे. हे तात्त्विक प्रश्न जग, कर्म, जगकर्ता इत्यादींशी निगडित आहेत. शरीरच सर्व-काही आहे की त्याचे दहन केल्यावर दुसरे काही तरी सुरक्षित राहते ? ही विचार करणारी, समजून घेणारी व करणारी शक्ती भौतिक आहे की

**दार्शनिक सिद्धांत अथवा आध्यात्मिक निर्णय**

काही वेगळीच आहे ? या दृश्य जगाचे वास्तविक स्वरूप काय आहे ? या जगाचा कोणी निर्माता आहे का ? दुःखाचे कारण काय आहे आणि त्यापासून मुक्त झाल्यानंतर आत्म्याची काय अवस्था होते ? आत्म्याचा परमात्म्याशी काय संबंध असतो ? या किंवा तत्सम अन्य प्रश्नांची समर्पक उत्तरे देण्याचा प्रयत्न धर्मज्ञान करते.धर्माचा हा दार्शनिक पक्ष होय.

दार्शनिक सिद्धांतांचे अवलोकन केले तर धर्माधर्मांमध्ये त्यांत फरक पडलेला दिसतो. या दार्शनिक सिद्धांतांनाच 'मत' म्हणतात. ही मते पुढे करून धर्माच्या नावावर रक्तही सांडले गेले आहे आणि धर्माने कित्येक लोकांना शांतीही दिली आहे. वास्तविक या धार्मिक सिद्धांतांचा हेतू माणसाला सत्याचा बोध करवून देणे व परमसत्तेला (परमात्म्याला) समजून घेणे असा होता. परंतु त्याचा वृथाभिमान धरून अनुयायानी वादविवाद, मतभेद व वैमनस्य यांना जन्म दिला. या सैद्धांतिक तथ्यांना सदाचरणाचा पाया घालण्याचे कार्य करावयाचे होते पण मागाहून आलेले लोक हा पायाही अनाचाराच्या भूमीवर रचू लागले.

अभौतिक, आध्यात्मिक किंवा गूढ रहस्यांचा उलगडा आपल्या बुद्धीने दूर करता येणे शक्य नाही या एकाच गोष्टीबाबत बहुधा सर्व धर्मांच्या लोकांचे एकमत आहे. म्हणून प्रत्येक धर्मसंस्थापकाने एक तर असे सांगितले आहे की, ही सैद्धांतिक तथ्ये त्याला परमात्म्यापासून प्राप्त झाली आहेत किंवा त्या धर्मसंस्थापकाच्या अनुयायांनी त्यालाच 'भगवान' मानले. यामुळेही जगात द्वंद्व पसरले आणि ईश्वरवादी लोकांमध्येच ईश्वराविषयी मतैक्य नसल्याचे पाहून लोक नास्तिक बनू लागले व त्यांनी धर्म म्हणजे अंध-विश्वास असे मानले.

(३) धर्माचे एक मुख्य अंग म्हणजे साधना, उपासना किंवा पुरुषार्थ होय. संपूर्ण आध्यात्मिक विकास, प्रभुमिलन किंवा मुक्तीची प्राप्ती यांसाठी

**साधना, उपासना, यज्ञ-याग इत्यादी**

माणसाने काय करावयास हवे याचाही बोध धर्म करून देतो. कोणी विष्णू देवतेच्या भक्तीचा उपदेश केला, तर दुसऱ्याने दुर्गा देवीची भक्ती करण्यास सांगितले. कोणी निराकाराच्या उपासनेचा प्रचार केला, तर कोण्या दुसऱ्याने यज्ञ किंवा जप हे याचे साधन आहे असे सांगितले.

सैद्धांतिक मतभेदांमुळे साधनांमध्येही भिन्नता निर्माण झाली. साधनेला बाजूला सारून अनुयायी आपापल्या मतांचा प्रचारच अधिक करू लागले. साधना करून साध्य प्राप्त करावे, उपासनाद्वारे उपास्य दैवताचे गुण आपल्या जीवनात आणले जावेत किंवा पुरुषार्थाद्वारे उच्च प्राप्ती केली जावी हा यांमागील हेतू होता. परंतु ते करण्याऐवजी लोक आपापसांतच भांडू लागले. ही भांडणे पाहून कोणी-कोणी असे म्हणावयास लागले की, "अरे !भांडू नका. सर्व मार्ग एकाच लक्ष्याप्रत घेऊन जाणारे आहेत." भांडणे मिटावीत या शुभेच्छेने त्यांनी जणू सत्यावरच पडदा पाडण्याचे काम केले. कोणी या सर्व गोष्टी म्हणजे एक बखेडा, झंझट किंवा अवडंबर मानून धर्म-चर्चा करण्याचेच सोडून दिले. वास्तविक साधनाद्वारेच माणूस काही ना काही प्राप्त करतो. परंतु साधनेला काहीसे विचित्र वळण देऊन कित्येक लोक साधू व संन्यासी बनले आणि त्यांनी कर्म संन्यास केला व इतरांकडून आपली सेवा करवून घेऊ लागले. काहींनी तर साधनेला तिलांजलीच दिली.

(४) कालांतराने प्रत्येक धर्माच्या लोकांचे आपापले असे काही रीतिरिवाज, विधि-नियम किंवा क्रियाकर्मे प्रचलित झाली. हळूहळू त्यांचे रुपांतर कर्मकांडांत झाले. प्रारंभी यांमागील हेतू कदाचित हा असेल की,

**रीतिरिवाज आणि कर्मकांड**

वैयक्तिक तसेच सामाजिक कार्य करताना माणसाच्या मनात ईश्वराची स्मृती असावी आणि धर्म-भावना राहावी. परंतु हे विधिनियम इत्यादी सूक्ष्मतेला सोडून स्थूल झाल्याने जटिल बनले आणि धर्मात त्यांनाच प्राधान्य प्राप्त झाले. त्यामुळे सर्वसामान्य लोकांनी ही कर्मकांडेच करणे सुरू केले. एवढेच नव्हे तर ते पंड्ये, याज्ञिक, पुजारी वगैरेंना पैसे देऊन आपल्या नावे यज्ञ, पूजा, अनुष्ठान, जपजाप्य इत्यादी करवू लागले.

## धर्म व कर्म यांविषयी काही ठळक मते

वर धर्माचा जो त्रोटक परिचय करून देण्यात आला आहे त्याच्या पार्श्वभूमीवर हे समजणे सोपे जाईल की, धर्म व कर्म यांविषयी प्रत्येकाने वेगवेगळे मत का व्यक्त केले.

धर्मांत कर्मकांडाची रेलचेल पाहिल्यावर काही लोकांनी धर्म म्हणजे एक अवडंबर किंवा भटा-ब्राह्मणांच्या कमाईचे साधन अशी समजूत करून घेऊन त्याकडे पाठ फिरविली. त्यांनी हा विचार केला नाही की, शेतातील धान्याच्या रोपांबरोबर उगवलेले हे तण आहे; ते आपण उपटून टाकावयास हवे. केवळ तण पाहून धान्याची रोपे सोडता कामा नयेत.

## धर्माला कर्म मानणारे लोक

यांचे प्रतिपक्षी म्हणजे धर्माला कर्म मानून कर्मकांडांतच रात्रंदिवस गढून गेलेले लोक होत. ते धर्माची सूक्ष्म तत्त्वे व सदाचाराचे नियम आपल्या जीवनात धारण करीत नाहीत. न रागावणे, अहिंसा, इंद्रियनिग्रह इत्यादींच्या कलाही त्यांच्या जीवनात दिवसेंदिवस वाढीस लागत नाहीत, आध्यात्मिक श्रेष्ठताही त्यांच्या जीवनात आढळून येत नाही, केवळ मंत्रजप, पाठ-पूजा, यज्ञ-यात्रा यांमध्येच ते गढून जातात आणि हठक्रियाही करतात. असे करणे चुकीचे आहे हे उघडच आहे. क्षौर, मुंज इत्यादी विधी तसेच रोजच्या रोज ब्राम्हणाला बोलावून कर्मकांड करीत राहणे म्हणजेच जर धर्म असेल तर खर्चिक रीतिरिवाजालाच धर्म असे नाव द्यावे लागेल. ही काही सत्याचा साक्षात्कार करणारी, परमसत्तेची (परमात्म्याची) अनुभूती करून देणारी तसेच चारित्र्य उज्ज्वल करणारी साधना म्हणता येणार नाही. या चुकीच्या दृष्टिकोनामुळेच तर धर्म बदनाम झाला आहे.

## कर्माला धर्म मानणारे लोक

कर्मालाच धर्म मानणाऱ्या लोकांचाही एक वर्ग आहे. धर्मांमधील सैद्धांतिक मतभेद तसेच कर्मकांडांची रेलचेल पाहून ते धर्मावर चिडलेले आहेत. ते म्हणतात की, धर्म ही काही वेगळी गोष्ट नव्हे, कर्म करणे म्हणजेच धर्म होय. माणसाने आपली कर्मे करीत राहिले पाहिजे, प्रामाणिकपणे कर्म करणे म्हणजेच

धर्म होय. माणसाने आपली कर्मे करीत राहिले पाहिजे, प्रामाणिकपणे कर्म करणे म्हणजेच धर्म होय. त्यांचे असे म्हणणे आहे की, जर एखादा माणूस गृहस्थाश्रमी असेल तर त्याने आपल्या मुलांबाळांचे पालनपोषण करणे, कचेरीत किंवा कारखान्यात व्यवस्थित काम करणे हाच त्याचा धर्म होय. याशिवाय ते योगादी साधनांनाही मानीत नाहीत तसेच सैद्धांतिक ज्ञान ऐकणेही आवश्यक समजत नाहीत. हा दृष्टिकोनही योग्य नव्हे. कारण कर्म करताना माणसासमोर एखादा नियम, एखादी आचार-संहिता किंवा एखादे नैतिक मूल्य असावेच लागते. प्रामाणिकपणा किंवा कर्तव्यपालन हा तर एक दिव्य गुण आहे. असे इतर बरेच गुण धारण करण्यास धर्मच शिकवितो.

तसेच, मानवी जीवनाचे उद्दिष्ट काय आहे, इतर लोकांशी आपला काय संबंध आहे, आपण जी कर्मे करतो त्यांचे फळ पुढील जन्मीही मिळते की देहाबरोबर तीही सर्व समाप्त होतात ? देह, धन आणि घर म्हणजेच सर्वस्व आहे की, ही केवळ कर्मे करण्याची व उपभोगण्याची साधने आहेत आणि आपण आपल्या अस्तित्वात यांच्याहून भिन्न अभौतिक तसेच शाश्वत आहोत ?— जोपर्यंत माणसाच्या बुद्धीत ही आणि इतर अशा प्रकारची सत्ये स्पष्ट नसतील तोपर्यंत कर्म, व्यवहार किंवा व्यापार यांविषयी त्याचा खरा दृष्टिकोन कसा निश्चित होईल व सत्य जाणून घेण्याची माणसात जी स्वाभाविक प्रवृत्ती असते तिचे कसे समाधान होईल ?

त्याचप्रमाणे कर्म हे ज्ञानावर व इच्छेवर अवलंबून असते. धर्मज्ञानच माणसाची इच्छा शुद्ध व मर्यादित करते आणि त्याचे विकृत स्वरूप तिला उच्छृंखल, बेताल व स्वार्थी बनविते. भौतिकवादी दृष्टिकोन बाळगणाऱ्या पाश्चात्य देशांत आज जो असंतोष, अशान्ती व स्वैराचार माजलेला प्रत्यक्षात दिसत आहे त्याचे कारण धर्मज्ञानाचा अभाव हेच आहे.

### धर्म व कर्म वेगवेगळे मानणारे लोक

लोकांचा जो तिसरा प्रकार आहे त्यांचे असे म्हणणे आहे की, धर्म ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे, त्याबद्दल प्रत्येकाला स्वातंत्र्यही आहे. परंतु राष्ट्राच्या किंवा समाजाच्या बाबतींत धर्माचा कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप होता

कामा नये. पहाटे उठून ज्याची जशी भावना असेल त्याप्रमाणे त्याने पूजा-पाठ करावा, नमाज पढावा किंवा ग्रंथसाहेब वाचावा पण जेव्हा देश किंवा समाजाच्या कामांबद्दल चर्चा उद्भवेल तेव्हा माणसाने धर्मनिरपेक्ष व्हावयास हवे. देशात अनेक धार्मिक मते प्रचलित असल्याने कित्येक लोकांचा असा हा दृष्टिकोन बनला आहे. परंतु शैक्षणिक संस्थांतून धार्मिक शिक्षण बहिष्कृत झाल्याने आज विद्यार्थ्यांमध्ये बेशिस्त कोणत्या थराला जाऊन पोहोचली आहे हे आपण प्रत्यक्ष पाहतच आहोत. असहिष्णुता, हिंसा, द्वेष इत्यादीं ऐवजी धर्मावरच 'बहिष्कार' घातल्याने आज जेथे तेथे लाचलुचपत, काळाबाजार, नफेबाजी व अन्यप्रकारचे भ्रष्टाचार यांना अगदी ऊत आला आहे.

नंतर, ही गोष्ट विसरण्यात आली आहे की, धर्म हा केवळ व्यक्तीच्या शांतीसाठी किंवा ईश्वरानुभूतीसाठी नाही तर समाजाला एकसूत्री, पवित्र व प्रेमसंपन्न करण्यासाठीही आहे. एवढेच नव्हे तर तो व्यक्तीसाठी काही नियम निश्चित करून समाजाच्या समस्यांचे निर्मूलनही करतो. जर ही गोष्ट नीट समजून घेऊन मान्य केली गेली तर राष्ट्रीय व सामाजिक बाबतींत धर्म-निरपेक्षतेचे तत्त्व लागू करावयास हवे असे कोण म्हणू शकेल ? सदाचार किंवा नैतिकतेबाबतीत बोलावयाचे म्हणजे आपण सर्वोत्कृष्ट अर्थात दैवी आचार दाखवून देणाऱ्या धर्माचे शिक्षण शाळांमधून द्यावयास हवे. कारण उद्दिष्ट श्रेष्ठ असणे आवश्यक आहे. दार्शनिक सिद्धांतापुरते सांगावयाचे म्हणजे सर्वात अधिक कोणत्या धर्माचे सिद्धांत तर्कशुद्ध, आचार उज्ज्वल करणारे व साधनेलाही सहज, स्वाभाविक आणि मानसशास्त्रशुद्ध बनविणारे आहेत हे पडताळून पाहता येणे शक्य आहे. खर्चिक कर्मकांडांविषयी बोलावयाचे म्हणजे ते आपण व्यक्तीवर सोपवू शकतो. परंतु धर्मच सोडून देणे किंवा त्याबद्दल निरपेक्ष वृत्ती बाळगणे किती घातक ठरले आहे. हे सांप्रत आपण पाहतच आहोत.

### व्यापार व व्यवहार यांना धर्मापासून वेगळे मानणारे लोक

चवथ्या प्रकारात मोडणारे लोक वैयक्तिक कार्य-व्यवहारातही धर्माला कर्माहून वेगळे समजतात. ते पहाटे पूजा-पाठ वगैरे करतात परंतु जेव्हा आपल्या

दुकानात बसतात तेव्हा धर्माला घरीच सोडून आलेले असतात. जेव्हा एखादे गिऱ्हाईक अशा दुकानदाराला म्हणते की, "तू एक धार्मिक माणूस आहेस म्हणून तू काळाबाजार वगैरे करू नकोस." त्यावर तो दुकानदार उत्तरतो, "अरे, धर्माची गोष्ट घरी. आता व्यापाराबाबतीत काय बोलायचे ते बोल." त्याचप्रमाणे, गीता वाचताना हे लोक उच्च स्वरात म्हणतात, "हे अर्जुन ! काम, क्रोध, लोभ म्हणजे नरकाचे द्वार होय." परंतु गीता-पाठ पुरा होताच ते आपल्या मुलांना रागे भरण्यास सुरू करतात, रात्री कामांध होऊन नरकगामी बनतात आणि दिवसभर दुकानात किंवा कचेरीत काळाबाजार करून किंवा लाच घेऊन लोभाच्याही आहारी जातात. अशा तऱ्हेने आज गृहस्थ व आश्रम वेगळे झाले आहेत. धर्म व कर्म वेगवेगळे झाले आहेत. मंदिरात हे लोक डोके टेकतात परंतु आपल्या घराला मंदिर न बनविता तेथे पाप करण्याची मुभा आहे असे समजतात. हा दृष्टिकोनही चुकीचा आहे हे उघडच आहे. माणसाने पतित होण्यापासून सुरक्षित राहावे याच हेतूने तर धर्माचा उगम झाला. जर याची पूर्ती होत नसेल तर तो धर्म कसला ?

लेखाचा बराच विस्तार झाला आहे. तेव्हा तो आवरता घेताना थोडक्यात हे सांगणे योग्य ठरेल की, धर्माचा कर्माशी घनिष्ठ संबंध आहे. वास्तविक आपली कर्मे सुधारणे हा धर्माचा एक मुख्य उद्देश आहे, मग ती कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय असोत. याव्यतिरिक्त माणसाचे संस्कार व व्यवहार सुधारून त्याला समाजाचा एक उपयुक्त घटक बनविणे आणि त्याची आध्यात्मिक उन्नती करून त्याला देवत्वाच्या योग्यतेस चढविणे हेही धर्माचे उद्दिष्ट आहे.

सुप्रसिद्ध उत्क्रांतिवादाचा जनक चार्ल्स डार्विन याने 'योग्यतमांचेच जगणे' (Survival of the Fittest) सिद्धांत मांडून लोकांत द्वंद्व वाढविले आहे आणि कार्ल मार्क्स या प्रसिद्ध साम्यवादाच्या जनकाने माणसाला माणसाचा केवळ सोबतीच (Comrade)बनविला आहे. परंतु धर्म माणसांचे नाते शांती, प्रेम व दया यांचा सागर अशा परमपिता परमात्म्याशी जोडून त्यांच्यात बंधुत्वाची भावना निर्माण करतो आणि त्यांना शांत, प्रेमळ व दयाळू बनण्याची शिकवण देतो. एवढे मात्र खरे की, धर्माचे स्वरूपच जर विकृत झाले तर ती गोष्ट वेगळी.

तसे पाहिले तर आज चीनचे कॉम्रेडही रशियाच्या कॉम्रेडाविरुद्ध गेले आहेत आणि साम्यवादाने जगात तर साम्य साधलेलेच नाही.

तेव्हा, सांप्रत परमपिता परमात्मा अथवा गीतेचा भगवान जे ज्ञान (दर्शन पक्ष) सांगत आहे तसेच योग (साधना पक्ष), दिव्य गुणांची धारणा व पवित्रता (आचार पक्ष किंवा जीवनदर्शन), कर्म करीत असताना पवित्र राहणे व दिव्य मर्यादेचे पालन करणे इत्यादींचे जे शिक्षण देत आहे ते नीट समजून घेऊन आपणास कर्म श्रेष्ठ व विकर्म (पाप) दग्ध करावयास हवे, व योगाद्वारे ईश्वरी आनंद प्राप्त करावयास हवा. सध्या धर्म विकृत झाल्याचे पाहून धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी भगवान स्वतः आलेला आहे. तेव्हा, आपणास या सत्य धर्मापासून संपूर्ण लाभ घेणे अत्यावश्यक आहे.

# धर्म आणि विज्ञान

## (१)

एक काळ असा होता की त्यावेळेस लोकांचा कल धर्माकडे होता. मनुष्य, सृष्टी आणि तिचा निर्माता या विषयी लोकात कुतुहल होते. जन्म आणि मृत्यू, कर्म आणि फल, आत्मा आणि परमात्मा, लोक आणि परलोक यांच्या रहस्यांबद्दल त्यांना तीव्र जिज्ञासा होती. परंतु आज आपण पाहातो की, विज्ञानाने केलेल्या चमत्कारांमुळे त्याचा फार मोठा प्रभाव लोकांवर पडलेला आहे आणि विज्ञानालाच ते अधिक महत्त्व देत आहेत. तेव्हा, विद्वान धर्मवेत्त्यांनी विचार करावयास हवा की हे असे का झाले आणि मनुष्याच्या स्वतःच्या तसेच सामाजिक जीवनात विज्ञानापेक्षा धर्माला गौण स्थान मिळाल्याने आज काय परिणाम झाला आहे व वास्तविक उभयतांचे स्थान काय असावे ? आपल्या दृष्टीने धर्माचा विज्ञानाशी काय संबंध आहे हेही आपणास पाहावयास हवे. हे एकमेकांना पूरक आहेत की विरोधी आहेत ? परंतु ही सारी चर्चा करण्यापूर्वी सरळ शब्दांत विज्ञान आणि धर्म यांची एक सोपीशी व्याख्या करणे आवश्यक आहे.

### विज्ञान काय आहे आणि धर्म काय आहे ?

वास्तविक, प्रकृती (Matter) आणि तिच्या शक्ती (Energy or Forces) यांच्या मागे दडलेल्या नियमांचे अध्ययन म्हणजे 'विज्ञान' होय. प्रकृतीमध्ये रूपांतर किंवा परिवर्तन होऊन जे पदार्थ तयार होतात त्यांचे गुणधर्म (Properties)प्रभाव (Effects)अथवा उपयोग (Uses)तसेच प्राकृतिक जगात ज्या क्रियाप्रतिक्रिया (Actions & Reactions) होतात त्या पद्धतशीरपणे जाणून घेणे, त्यांचे निरीक्षण करणे आणि प्रयोगाने ते पडताळून पाहाणे याचे नाव 'विज्ञान' आहे.

धर्माचे क्षेत्र याहून भिन्न आहे. धर्म माणसासाठी कर्तव्य आणि अकर्तव्य कोणते हे निश्चित करतो. त्याला चारित्रिक आणि नैतिक मूल्ये सांगतो. त्याच्या आचरणासाठी एक मर्यादा किंवा आचार-संहिता ठरवून देतो आणि त्याला

प्रकृतीपेक्षा भिन्न अशा अविनाशी चैतन्याचा अर्थात् आत्म्याचा बोध करवितो. तसेच त्या चैतन्याच्याच स्मृतीत स्थित होण्यावर अधिक भर देतो. 'धर्म' शब्दाचा अर्थ आहे धारणा; म्हणून धर्म माणसाला जीवनात काही चांगले नियम, सद्गुण, चांगले विचार व दृष्टिकोण आत्मसात करावयास सांगतो आणि त्याला दुष्कर्म करण्यापासून परावृत्त करतो व त्यापासून दूर राहण्याकरिता उपायही देऊन ठेवतो.

धर्म आणि विज्ञान या दोघांचाही हेतू मानवाला अधिक सुखी करणे हाच आहे. एवढे खरे की काही धर्म सुखापेक्षा शांतीला अधिक महत्त्व देतात आणि काही तर सुखाला काक-विष्टासमान सांगून त्याचा संन्यास करण्यासही सांगतात. धर्म आणि विज्ञान यांच्या हेतूंमध्ये एक फरक आहे. वैज्ञानिक वर्तमानकालीन लौकिक जीवन सुख-सोयींनी अधिक संपन्न करण्याचा प्रयत्न करतो तर याउलट धर्म इहलोकीच्या जीवना व्यतिरिक्त त्यानंतरच्या जीवनाच्या सुखालाही फार महत्व देतो.

वैज्ञानिक आपला हेतू सिद्धीस नेण्यासाठी संशोधन (Research) निरीक्षण (Observation) आणि परीक्षण (Experimentation) या पद्धती आत्मसात करतात, परंतु धर्मवेत्ते ईश्वराद्वारे झालेल्या रहस्यांचा उलगडा (Revelations) महात्म्यांची वचने (Versions of great souls) दिव्य साक्षात्कार (Divine Visions) व अलौकिक अनुभव (Spiritual, superphysical of mystical experiences) यांना अधिक महत्त्व देतात. कारण त्यांच्या अध्ययनाचा विषयच मुळी अलौकिक, पारलौकिक आणि अतींद्रिय (Extra-sensory) असतो.

### लोकांचा कल धर्मापेक्षा विज्ञानाकडे का ?

प्रत्येक धर्म जेव्हा अस्तित्वात आला तेव्हा त्याच्या संस्थापकाने माणसाला दुष्कर्मापासून परावृत्त होण्याचा आणि चांगुलपणाला आत्मसात करण्याचा उपदेश करून त्याला काही उच्च नैतिक मूल्ये दिली आणि परिणामतः माणसाला काही अंशी शांती मिळाली. नियम आत्मसात केल्याने त्याला थोडासा अतींद्रिय सुखाचा अनुभवही होत राहिला. त्यामुळे धर्मावर त्याचा विश्वास बसत चालला,

परंतु हळूहळू माणूस धर्मापासून दूर होत चालला. त्याची अनेक कारणे आहेत. त्यांतील काही कारणांचा उल्लेख खाली करण्यात आला आहे.

### (१) सिद्धांतांमध्ये उणीव, अपूर्णता किंवा अस्पष्टपणा

प्रत्येक धर्माने समाजाला आत्मा, परमात्मा, सृष्टी आणि कर्म इत्यादींविषयी जे ज्ञान दिले ते काही अंशी कालांतराने वैज्ञानिकांच्या संशोधित ज्ञानापुढे खोटे ठरले. उदाहरणार्थ, एका धार्मिक ग्रंथात पृथ्वीला चपटी व वर्तुळाकार मानण्यात आले होते परंतु नंतर वैज्ञानिकांनी तिला मोसंबीच्या फळासारखी गोल सिद्ध करून दाखविले. दुसऱ्या ग्रंथात जड आणि चेतन ही एकाच तत्त्वाची दोन रूपे आहेत हे सिद्ध करण्यासाठी पुढील दृष्टांत देण्यात आले होते. ज्याप्रमाणे जड शेणातून चेतन किडे निर्माण होतात किंवा चेतन कोळी आपल्यातूनच जड जाळे बाहेर काढतो त्याप्रमाणे सर्व जड-चेतन वस्तू एकाच 'ब्रह्म' तत्त्वाची भिन्न-भिन्न रूपे आहेत. परंतु वैज्ञानिकांनी सूक्ष्मदर्शक यंत्राने सिद्ध करून दाखविले की शेणात किडे आधीपासूनच असतात आणि कोळी आपल्या शरीरातूनच जाळे बाहेर काढतो.

कित्येक धर्मांमध्ये परमात्म्याला सर्वव्यापी मानले गेले होते; वैज्ञानिकांना मग प्रश्न पडला की, लोखंडात व्यापक झाल्याने जसे अग्नीचे गुण लोखंडात व्यापक होतात किंवा दुधात विरघळल्याने साखरेची गोडी जशी दुधात उतरते तसेच आनंद, शांती, प्रेम इत्यादी परमात्म्याचे गुण विश्वव्यापी का नाहीत? जगात जे काही होते ते परमात्माच करतो असे एका धर्मात सांगितले जात होते. तेव्हा बुद्धिवादी लोक म्हणू लागले की, जर सर्वकाही परमात्माच करतो तर मग जगात अनाचार तथा पापाचार का होतात? तसेच कोण्या एका धर्मात असे मानले गेले होते की परमात्मा सर्वांची शरीरे निर्माण करतो, पाऊस पाडतो, भूकंप आदी घडवून आणतो. परंतु वैज्ञानिकांनी निरीक्षण करून पाहिले की शरीर तर जीवाणू निर्माण करतात, सूर्याच्या उष्णतेने पाण्याची वाफ होऊन त्याचे ढग बनतात आणि मग पाऊस पडतो आणि पृथ्वीच्या पोटातील उष्णतेच्या परिणामामुळे भूकंप होतात. अशाप्रकारे, जेव्हा वैज्ञानिक आपले सिद्धांत प्रत्यक्ष प्रयोगांनी सिद्ध करून दाखवू लागले आणि बुद्धिवादी लोक धर्मावरील आपले

विचार मांडू लागले तेव्हा प्रचलित धर्मावरील लोकांचा विश्वास हळूहळू कमी होऊ लागला आणि आपला धर्म ईश्वराद्वारे स्थापन केला गेला आहे अशी जी त्यांची भावना होती तिला ओहोटी लागली.

### (२) धर्मातील अनेक प्रकारची व्रत-वैकल्ये, हठक्रिया, जड-पूजा इत्यादी

याव्यतिरिक्त कित्येक धर्मांत ज्या अनेक प्रकारच्या गैरसमजूती, व्रत—वैकल्ये,कर्मकांड, वृक्ष, सूर्य आदींची पूजा, घरादाराचा संन्यास करणे तथा नाना तऱ्हेच्या यातना देणाऱ्या किंवा कष्टदायक हठयोगी क्रियांच्या साधना इत्यादी होत्या, त्यामुळे लोकांनी धर्माकडे पाठ फिरविली. विज्ञान इहलोकीच जीवनात सहज सुख देते आणि त्याउलट धर्माचार्य अनेक कष्टसाध्य साधना करावयास लावतात व ते सुद्धा पुढील जीवनाच्या सुखाची आशा दाखवून, हे जेव्हा त्यांनी पाहिले तेव्हा धर्माबद्दलचा त्यांचा उत्साह कमी झाला.

### (३) धर्मवेत्त्यांमध्ये मतभेद आणि धर्मवेडेपणा

जगात अनेक धर्म स्थापन केले गेल्याने धर्मवेत्त्यांमधील मतभेद ही वाढत गेले. एकाच परमात्म्याच्या बाबतीत अनेक मते निर्माण झाली आणि जो तो आपल्याच मताला खरे मानून त्याचे कट्टर अभिमानी बनले. त्याचा परिणाम धर्माच्या नांवावर अनेक आक्रमण, लढाया, तंटेबखेडे होण्यात झाला. शांतीसाठी निर्माण केलेला धर्म अशांतीचा एक कारण होऊन बसला. एकीकडे वैज्ञानिक सप्रयोग आपले सिद्धांत सिद्ध करून दाखवून दुसऱ्यांना एकमत होण्यास भाग पाडू लागले तर दुसरीकडे धर्मवेत्त्यांमध्ये मतभेद वाढतच गेले आणि त्यांना आपले सिद्धांत वैज्ञानिक पद्धतीने सिद्ध करून दाखविता येईनात.

### (४) धर्मवेत्त्यामध्ये उच्च धारणेचा अभाव

धर्मापासून दुरावण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे धर्माचार्य, पंडित, शास्त्रवादी, विद्वान यांचे नैतिक किंवा आध्यात्मिक जीवन श्रेष्ठ, आदर्शवत राहिले नाही. धर्माचा अर्थच मुळी 'धारणा' आहे. साहजिकच, जेव्हा धर्मवेत्त्यांमध्येच श्रेष्ठ धारणा राहिली नाही तेव्हा धर्माची मोठीच हानी झाली. लोक भौतिकवाद तसेच

विज्ञानाच्या चमत्कारांच्या कच्छपी लागले आणि त्यांनी चारित्रिक मूल्यांना केवळ अप्राप्य आदर्श म्हणून मानणे सुरू केले. अशा तऱ्हेने विज्ञानाच्या उन्नतीसाठी माणसाने आपले तन, मन, धन आणि जीवन सारे काही वाहिले आणि धर्म केवळ भक्त, पुजारी /पाद्री/ इत्यादी विशिष्ट लोकांवरच सोपविला.

### आजच्या जीवनात धर्माचे स्थान

उपर्निर्दिष्ट कारणांमुळे आज जग धर्मापेक्षा विज्ञानाचे महत्त्व अधिक मानते. विज्ञानाने मनुष्याला स्वास्थ्य, स्वच्छता, सुखसोई इत्यादींसाठी जी काही साधने दिली आहेत त्याने माणूस अतिशय भारला गेला आहे आणि आज राष्ट्र तसेच लोक विज्ञानाकडे अधिक लक्ष देत आहे. चारित्रिक मूल्ये, नैतिक परंपरा, धार्मिक मर्यादा आज आपले महत्त्व गमावून बसली आहेत आणि माणूस उच्छृंखल होऊन संशोधनात मग्न झाला आहे. याचा परिणाम असा झाला की, जे विज्ञान माणसाला सुखाची साधने देत आले होते त्यानेच आज माणसाच्या विनाशाकरिता पुरेशी सामग्री तयार करून ठेविली आहे. अशा रीतिने धर्माचे अंकुश नसलेल्या विज्ञानाने आज माणसाला आणि राष्ट्रांना फार मोठा धोका निर्माण केला आहे. आज जगात माणूस सुखसोईची भौतिक साधने विज्ञानाद्वारे प्राप्त करून घेत आहे परंतु त्याचबरोबर स्वतःलाही गमावून बसला आहे.

### जीवनात धर्माचे व विज्ञानाचे स्थान काय असावे?

आज माणसाने विज्ञानाच्या साहाय्याने चंद्रावर जाऊन पोहोचण्याचा अपूर्व पराक्रम करून दाखविला आहे परंतु दूरवरच्या चंद्राजवळ जाणारा माणूस मनाच्या खऱ्या शांतीपासून मात्र चंद्रापेक्षाही दूर गेला आहे. निरंकुश विज्ञानाने हायड्रोजन बॉम्ब, आण्विक क्षेपणास्त्रे इत्यादी जी माणसाच्या विनाशाची साधने निर्माण केली आहेत त्याचा परिणाम ही आज आपल्या डोळ्यांसमोर आहेच. माणसाचे घर प्लास्टिकच्या सुबक रंगीबेरंगी वस्तू टेलिफोन, ट्रांझिस्टर, टी. व्ही. इत्यादी साधनांनी भरलेले असूनही त्याचा आत्मा मात्र अशांतच आहे, त्याचे हृदय खऱ्या सुखाला मुकलेले आहे आणि त्याचे जीवन चारित्रिक दृष्टिकोणातून पाहिल्यास फारच मागासलेले दिसत आहे. तेव्हा, विज्ञानाद्वारे माणसाने सृष्टीची

तत्त्वे जाणलीही असतील. परंतु त्याचा काय उपयोग? स्वतःला तर तो जाणू शकला नाही ना? म्हणजे दिव्याखाली अंधार, असलाच प्रकार झाला म्हणावयाचा !विज्ञानाचे संशोधन करणारा आणि नवीन शोध लावणाराही आत्माच आहे ना? म्हणजे विज्ञानापेक्षा आत्मा श्रेष्ठ आहे हे माणसाला समजावयास हवे. विज्ञानाद्वारे जे काही मिळविलेले आहे त्याचा उपभोगही आत्माच घेत आहे. तेव्हा, ज्याच्यासाठी विज्ञानाचा हा सारा खटाटोप आहे आणि जी वस्तु विज्ञानाचे शोध लावत आहे त्या अद्‌भूत आणि अनमोल वस्तूला न जाणणे ही माणसाची किती मोठी चूक आहे! म्हणून जीवनात मुख्य स्थान आत्मज्ञान आणि सहजयोग (Meditation)रूपी विज्ञान यांना असावयास हवे. अन्यथा भौतिक विज्ञानाला बेताल सोडण्याचा परिणाम काय होतो हे सध्या एका उदासीन, निर्दयी, लुटालूट करणाऱ्या भौतिकवादी संस्कृतीच्या रूपात आपण पाहातच आहोत.

## भवितव्यात धर्म आणि विज्ञान यांचे स्थान

आता आम्हास परमपिता शिव परमात्म्याने जे ईश्वरी ज्ञान व विज्ञान (योग) यांची शिकवणूक दिली आहे त्याच्या आधारे आम्ही जाणतो की स्वतः परमपिता परमात्मा प्रजापिता ब्रह्मा आणि जगदंबा सरस्वती किंवा ॲडम आणि ईव्ह यांच्याद्वारे जो खरा धर्म स्थापन करीत आहे, तो फार उच्च कोटीचे आध्यात्मिक विज्ञानच आहे व तो भौतिक विज्ञानाने खंडित न होता परिपुष्टच होतो. स्वतः परमात्म्याद्वारे दिले गेलेले आत्मा आणि सृष्टी इत्यादी बद्दलचे सिद्धांत विज्ञानाच्या दृष्टिकोणातूनही सत्य ठरतात. म्हणजे वास्तविक विज्ञान काही खऱ्या धर्माला विरोध करीत नाही, उलट दोन्ही मिळून मानवाचे जीवन सुखी करतात. सत्य आणि त्रेतायुगी सृष्टीमध्ये आजच्या विज्ञानाचा सत्त्वांश होता परंतु तेव्हा त्याचे एवढे स्तोम माजले नव्हते. त्या युगात विज्ञान दुःखदायक नव्हते कारण माणसाची बुद्धी सात्त्विक होती आणि त्याचे कर्मही श्रेष्ठ होते. त्याकाळी विज्ञानाद्वारे प्राप्त झालेल्या साधनांच्या उपयोगाने आजकाल होणारे नुकसान किंवा दुर्घटना होत नव्हत्या.

आज विज्ञानाचा जो विकास होत आहे तो त्याची अंतिम सीमा सूचित

करत आहे. हे विज्ञान लवकरच या धर्मभ्रष्ट आणि कर्मभ्रष्ट जगाचा महाविनाश घडवून आणण्यास कारणीभूत होणार आहे. गेल्या शंभर वर्षांत विज्ञानाने जी प्रगती केली आहे ती याच अंतिम कारणासाठीच आहे. एकीकडे विनाशाची अशी तयारी चालू आहे तर दुसरीकडे परमपिता शिव परमात्मा सत्ययुगी, संपूर्ण सुखमय दैवी सृष्टीची पुन्हा स्थापना करण्यासाठी जे ईश्वरी ज्ञान देत आहे आणि सहज राजयोग शिकवित आहे ते त्रुटिविरहित एक संपूर्ण विज्ञान आहे. हे विज्ञान भौतिक विज्ञानापेक्षा अधिक शक्तिशाली असून सांप्रतच्या जीवनातही सुख-शांती देणारे आणि अत्यंत तर्कशुद्ध व संयुक्तिक आहे. ते ज्या प्रत्यक्ष दिव्य साक्षात्कार तसेच सूक्ष्म मानसशास्त्रीय व आत्मिक अनुभवांवर आधारलेले आहे ते फार उच्च कोटीतले आहेत. त्याद्वारे आम्हाला हेही कळले आहे की सध्या भौतिक विज्ञानाचा जो विस्तार आपण पाहात आहोत तो लवकरच होणाऱ्या महाविनाशानंतर टिकणार नाही परंतु त्याचे शुद्ध व सात्त्विक सत्त्व शिल्लक राहील आणि तो भविष्यकालीन सत्ययुगी सृष्टीत निर्भेळ सत्त्व व चिरस्थायी सुख देणारा ठरेल.

म्हणून सर्व धर्म–प्रेमी लोकांना आम्ही हा आशादायक संदेश देऊ इच्छितो की सांप्रत संपूर्ण सत्य धर्माची स्थापना स्वयं परमात्मा प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाद्वारे करीत आहे. परमपिता परमात्मा आहार–व्यवहार–आचाराची संहिता आम्हास प्रदान करून आमचे जीवन श्रेष्ठ करीत आहे. आम्ही सर्वांनी त्याचा लाभ घेऊन आपल्या पावन व शांत जीवनांने जगाला धर्माचे महत्त्व पटवून दिले पाहिजे.

# परमाणु-शक्ती विरुद्ध पारमात्मिक शक्ती

**सां**प्रत चालू असलेल्या युगाला कित्येक लोक परमाणु–युग (Atomic Age) हे नाव देतात. कारण परमाणुसंबंधी होत असलेल्या संशोधनाला ते सध्याची सर्वांत प्रमुख व महत्त्वपूर्ण घटना मानतात. यात काही संशय नाही की, या परमाणु-शक्तीचा उपयोग जर विधायक कार्यांत केला जाईल तर वाळवंटाचे नंदनवन बनविता येणे शक्य होईल, दळणवळणासाठी अतिशय वेगवान साधने उपलब्ध होऊ शकतील, वीज इतकी स्वस्त व इतक्या प्रमाणात निर्माण करता येईल की, साऱ्या जगात रात्रीचाही दिवस करणे शक्य होईल. त्याचप्रमाणे शेतीभाती, कारखाने, शहरे, खेडेगावे इत्यादींत अशी अभूतपूर्ण क्रांती घडवून आणता येईल की, दारिद्र्याचा मागमूसही राहणार नाही आणि हे जग एक अजब सृष्टी (Wonder-Land) बनेल. परंतु विधायक कार्यांऐवजी विध्वंसक कार्यांतच परमाणु–शक्तीचा उपयोग अधिक प्रमाणात केला जात असलेला आपण पाहतच आहोत. विज्ञानशक्तीद्वारे (Science Power)जी सामग्री निर्मिली जात आहे ती एक तर क्षणभंगुर सुख देण्याच्या किंवा भयानक विनाशाची सिद्धता करण्याच्याच कामी येत आहे. आतापर्यंत असंख्य डॉलर आणि अगणित रूबल परमाणुबॉम्ब बनविण्याच्या कामी खर्ची पडले असतील.

विज्ञान–शक्ती किंवा परमाणु-शक्तीची सूक्ष्मता तसेच तिचा विस्तृत व क्रांतिकारक प्रभाव पाहून कोणीही ही गोष्ट नाकारू शकणार नाही की, परमाणू-शक्ती ही एक जबरदस्त शक्ती असून अत्यंत आश्चर्यकारक वस्तू आहे. परंतु दुसरीकडे सांप्रतच्या युगात या परमाणु-शक्तीहूनही अधिक प्रबळ अशी एक शक्ती कार्यप्रवण आहे. आणि ती म्हणजे पारमात्मिक शक्ती किंवा शांतिशक्ती (Silence Power) होय. या शक्तीहून अधिक महान शक्ती असूच शकत नाही. हिच्यामुळे माणसाचा कायापालट होत असून जगात खरोखरच क्रांतीचा उदय झाला आहे. परमाणु–शक्तीचा शोध पश्चिमी देशांत लागला असेल परंतु ज्ञानसूर्य परमपिता परमात्म्याचे अवतरण येथे पूर्वेत भारत देशात झाले आहे. परमाणु–शक्तीला जाणणारे शास्त्रज्ञ विज्ञानाद्वारे (Science) महाभारी

विध्वंसक आण्विक अस्त्रे-शस्त्रे निर्माण करण्याच्या कार्यात गढून गेले आहेत तर येथे भारतात परमपिता परमात्मा शांतिशक्तीद्वारे (Silence Powers) माणसाची आत्मिक शक्ती वाढविण्याचे अत्यंत महान कर्तव्य करीत आहे.

परमपिता परमात्मा सहज ईश्वरी ज्ञान व सहज राजयोग शिकवून मनुष्यात्म्यांचे संस्कार शुद्ध करीत आहे आणि त्यांच्यात पवित्रतेचे बल भरीत आहे. यामुळे शांतीची शक्ती वाढत आहे आणि लवकरच साऱ्या जगात शांतता प्रस्थापित होईल यात तिळमात्रही संशय नाही. जेथे या शांतीच्या शक्तीची क्रिया अद्याप सुरू झालेली नाही तेथे विज्ञानाद्वारे माणसाचे जीवन कृत्रिम व अंतःकरण अशांत झालेले असून संस्कृती स्नेह-शून्य व वातावरण अस्थिर बनलेले आहे. पण येथे भारतात हळूहळू शांतीची शक्ती अधिकाधिक लोकांवर आपला प्रभाव पाडत चाललेली असून तिच्या प्रभावाचे क्षेत्र दिवसेंदिवस विस्तृत होत चालले आहे. अशा तऱ्हेने सांप्रत परमाणु-शक्ती विनाशाची सिद्धता करण्यात तर पारमात्मिक शक्ती सत्ययुगी, संपूर्ण सुख-शांतिमय दैवी सृष्टी पुन्हा स्थापन करण्यात गढून गेली आहे. परंतु लोकांना पहिल्या शक्तीची चांगलीच माहिती आहे. कारण ती भौतिक शक्ती आहे पण पारमात्मिक शक्तीचा परिचयमात्र त्यांनाच आहे, जे तिच्या संपर्कात आलेले आहे आणि आध्यात्मिक पुरुषार्थाद्वारेच सृष्टि सुख शांतिमय बनविण्यावर ज्यांचा संपूर्ण विश्वास आहे.

वास्तविक विनाशकारी विज्ञानशक्ती किंवा परमाणु-शक्ती हीसुद्धा शांतिशक्ती किंवा पारमात्मिक शक्तीच्या प्रेरणेनेच आपले कार्य करीत आहे. कारण आता प्रत्यक्ष परमपिता परमात्म्याच्या योजनेनुसार सत्ययुगी दैवी व धर्मपरायण सृष्टीची पुनर्स्थापना होत आहे. परंतु लोक हे जाणत नाहीत की, परमाणु-शक्तीविषयक शोधांचा परिणाम काय होईल आणि ती (परमाणु-शक्ती) कोणत्या विराट योजनेखाली कार्यरत झालेली आहे. तसेच त्यांना हेही माहीत नाही की, या शक्तीहूनही श्रेष्ठ जी शांतिशक्ती अर्थात परमपिता परमात्मा आहे, त्याचे कार्य म्हणजे वास्तविक चालू युगाची सर्वात प्रमुख अशी घटना आहे; म्हणून या युगाला परमाणु युगाऐवजी 'पुरुषोत्तम युग' असे नाव द्यावयास हवे. याच

युगाला 'संगम युग' असेही म्हणता येईल. कारण एकीकडे परमाणु-शक्तीद्वारे कलियुगी पतित सृष्टीचा महाविनाश आणि दुसरीकडे परमात्म्याद्वारे सत्ययुगी पावन सृष्टीची पुनर्स्थापना ही दोन्ही कार्ये एकसमयावच्छेदेकरून घडत आहेत व अशा तऱ्हेने सध्याचा समय हा उभय युगांच्या संगमाचा (मिलनाचा) समय आहे.

आज विज्ञानशक्तीद्वारे लोक चंद्रावर वस्ती करण्याचा प्रयत्न करीत आहेत, ते काही काळ अंतरिक्षात खास तयार केलेल्या यानाने (space-ship) जाऊन तेथे जो आनंदाचा व भाररहित (weightlessness) होण्याचा अनुभव करतात त्याला ते आपली फार मोठी मजल समजतात. परंतु येथे परमात्म्याकडून योग-शक्ती प्राप्त करून मानवमात्र सूर्यवंशी व चंद्रवंशी देवपद प्राप्त करण्याचा अथवा वैकुंठात जाण्याचा पुरुषार्थ करीत आहेत व ध्यानावस्थेद्वारे अंतर्वाहक शरीर धारण करून दिव्य-दृष्टीच्या साधनाने चंद्र, सूर्य व तारांगणाच्याही पार पलिकडील लोकांमधून (worlds) भ्रमण करीत हलकेपणा, अतींद्रिय सुख व उल्हास यांचा अलौकिक अनुभव करीत आहेत. पण ही 'मजल' अद्याप जनतेच्या लक्षात आलेली नाही हे तिचे दुर्दैवच म्हणावयाचे. ज्या दिवशी ही वार्ता सर्व वर्तमानपत्रांतून प्रकाशित होईल त्या दिवशी जगातील लोक भारताच्या योगयुक्त पुरुषार्थाबद्दल तसेच आत्मिक-शक्तीबद्दल (spiritual power) आश्चर्य व्यक्त करतील. परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे प्रत्यक्ष भारतवासीच याकडे कानाडोळा करीत आहेत.



# औद्योगिक व राजकीय क्रांती आणि शांती

**वि**श्वाला सुख-शांतिसंपन्न बनविण्यासाठी एका फार मोठ्या क्रांतीची आवश्यकता आहे असे सर्व वर्गातील लोकांची ठाम समजूत होऊन बसली आहे. राजकारणी लोकांना वाटते की, शेतकरी व कामकरी यांना त्यांच्या श्रमाचा पूर्ण मोबदला मिळत नाही आणि त्यांनी आपले रक्त आटवून व घाम गाळून केलेल्या कमाईवर भांडवलदार मजा उडवीत आहेत.तेव्हा, श्रमकरी व भांडवलदार एकाच पातळीवर यावेत व उभयतांमध्ये कसलेही अंतर राहू नये म्हणून हे राजकारणी लोक एक आर्थिक व राजकीय क्रांती आणू इच्छितात. त्यांना वाटते की, समाजात वंश, धर्म वा पैसा यांच्या रूपाने उच्च-नीच असा कोणताही भेदभाव असू नये. अशा प्रकारच्या विचारप्रणालीला ते साम्यवाद (कम्युनिझम) किंवा समाजवाद (सोशॅलिझम) असे नामाभिधान देतात. साम्यवादाचा सर्व जगात प्रसार व्हावा म्हणून चीन, रशिया व जगातील इतर देशांतील साम्यवादी पक्ष कोट्यवधी रुपये खर्च करीत आहेत. अनेक देशांत या क्रांतीसाठी लष्कराचा व शस्त्रास्त्रांचा फार मोठ्या प्रमाणात वापर केला गेला आहे आणि होत आहे. त्याचे पर्यवसान रक्ताचे पाट वाहविण्यात झाला आहे.

यामुळे माणसाला किंवा जगाला शांतीचा लाभ काही झाला नाही उलट जगात दोन गट पडले आणि कधी क्यूबात, तर कधी लाओसमध्ये, तर कधी व्हिएतनाममध्ये या दोन गटांत भयानक युद्ध होत असलेले आपण पाहतच आहोत. या क्रांतीचा परिणाम असा झालाआहे की, आज प्रत्येक देशात उलथापालथ घडत आहे, प्रत्येक कारखान्यात साम्यवादी व पुंजीवादी यांच्यात धक्काबुक्की चालली आहे. यामुळे सर्वत्र गडबड व गोंधळ माजलेला दिसत आहे. जेथे तेथे अब्जावधी रुपये आणि लक्षावधी लोकांचे श्रम बंदुका व बॉंब निर्माण करण्या व वापरण्यापायी व्यर्थ खर्ची पडत आहेत. परिणामतः बहुतेक सर्वच देशांत लोकांना वस्तूंची टंचाई, महागाई व कष्टमय जीवन यांचे चटके बसू लागले

आहेत. आणि आज जग एका भयानक जागतिक युद्धाच्या दिशेने अतिशय वेगाने वाटचाल करीत चाललेले दिसत आहे. तेव्हा, अशा प्रकारच्या आर्थिक, राजकीय वा सामाजिक क्रांतीने देश व लोक शांतीच्या जवळ येत चालले आहेत असे कोण सिद्ध करू शकेल ?

राजकारणात रस घेणारे लोक प्रथम अनियंत्रित राजांना पदच्युत करून त्यांच्या जागी लोकसत्ताक शासनसत्ता स्थापन करण्याच्या इराद्यानेही एक जगड्व्याळ क्रांती घडवून आणण्यात गढून गेले आहेत. याचा परिणामहि दृष्टीस पडत आहे. प्रत्येक देशात दर तीन ते पाच वर्षानंतर राज्यसत्ता काबीज करण्याकरिता हालचाली होतात, कोट्यवधी लोक मतदान करतात, उमेदवार आणि त्यांचे पक्ष कोट्यवधी रुपये व कोट्यवधी तास आपापल्या मतांचा किंवा निवडणूक-जाहीरनाम्यांचा प्रचार इत्यादींवर खर्च करतात. प्रजेने घाम गाळून केलेल्या कमाईवर कर लादून मिळविलेल्या पैशांनीच घडवून आणलेल्या या निवडणुकांमध्ये लोक भिन्न-भिन्न पक्षांचे उमेदवार निवडून देतात आणि हे निवडून आलेले उमेदवार नंतर विधानसभांत किंवा लोकसभेत गुरकावत एकमेकांवर तुटून पडतात व देशभर एकच प्रक्षोभ आणि हलकल्लोळ माजवितात. **अशा तऱ्हेने प्रस्ताव, कायदे वगैरे पास होतात, घोषणा दिल्या जातात, सभा, जलसे, मेजवान्या, विरोधी कारवाया, पत्रकार-परिषदा** (Press conferences) **वगैरे प्रकार होतात. परंतु तरी देखील जनता दुसऱ्या डब्यांतून मेंढरांप्रमाणे प्रवास करीत आहे, पूर्ण दूध पुरेसे मिळत नाही म्हणून परदेशातून आणलेल्या दूधाच्या पावडरीपासून बनविलेल्या दुधावर समाधान मानीत आहे आणि अन्नधान्यासाठी परदेशांकडे हात पसरावे लागत आहेत.** एवढेच नव्हे तर शाळा-कॉलेजात प्रवेश, घर व रोजगार, प्राण व वित्त यांचे संरक्षण, गुंडांपासून बचाव इत्यादी अनेक समस्यांमुळे लोकांना सुखाचा श्वासही घेता येत नाही.

दुसरीकडे काही लोक एक औद्योगिक किंवा तांत्रिक (Industrial or Technical)क्रांती घडवू इच्छितात. त्यांना वाटते की, कारखान्यांतून नवनवी यंत्रे लावून आणि नद्यांवर धरणे बांधून प्रचंड प्रमाणात वीज निर्माण केल्यास देशात

एक महान क्रांती घडविणे शक्य आहे. त्यांचे असे मत आहे की, या क्रांतीमुळे लोकांचे राहणीमान व काम करण्याच्या पद्धती सुखसोयींनी युक्त होऊ शकतील, बटन दाबताच काम चालू होऊ शकेल. थोडक्यात म्हणजे त्यांना प्रत्येक प्रकारची सुख-साधने सहज उपलब्ध होऊ शकतील आणि त्यांच्या प्राप्तीत बरीच वाढ झाल्याने त्यांची आर्थिक परिस्थितीही सुधारू शकेल.

**अशा प्रकारच्या वैज्ञानिक आणि औद्योगिक क्रांतीचे परिणामहि कोणापासून लपून राहिलेले नाहीत. निःसंशय, विज्ञानामुळे माणसाला अनेक सुखसोयी प्राप्त झाल्या आहेत. परंतु यंत्राच्या सान्निध्यात राहून तो स्वतःही एक यंत्र बनला आहे. माणुसकीचे कित्येक अमूल्य गुण तो आज गमावून बसला आहे. निसर्ग व परमात्मा या उभयंतांना तो दुरावला आहे. प्रेम व मित्रत्वाची भावना त्याच्यात पूर्वीप्रमाणे राहिलेली नाही. सांप्रत तो मानवी जीवनाला एक महत्वाची बाब मानीत नाही उलट तेही एक यंत्र समजून त्याच्याशी त्याच दृष्टीने व्यवहार करीत आहे. यामुळे त्याचे जीवन कृत्रिम बनले आहे व संस्कृतीही बेगडी झाली आहे.** परिणामतः आज माणसाच्या मनात एक मोठी खोल दरी निर्माण झालेली आहे. त्याच्या मनात शांती नाही, तर शांतीसाठी केवळ तडफड चालू आहे. विज्ञान व तंत्रज्ञान (Technology) यांनी प्रत्येक वस्तू आपल्या प्रयोगशाळेत व कारखान्यात बनविली असेल परंतु शांती काही त्यांना निर्माण करता आलेली नाही. वैज्ञानिक व तंत्रज्ञ यांना तरी आज कोठे सुखाची झोप येत आहे ! झोपेच्या गोळ्या घेतल्या तरच क्षणभर त्यांच्या डोळ्यास डोळा लागतो.

अशाप्रकारे निरनिराळ्या विचारसरणीच्या लोकांनी माणसाला सुख-शांती लाभावी म्हणून आपापल्या परीने क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला परंतु प्रत्यक्षात तो सुख-शांतीला दूरावतच चालला आहे. अनेक प्रकारच्या घोषणा व क्रांत्या यांनी माणसाचे जीवन जास्तच दुःखी व अशांत बनवून टाकले आहे आणि जगात संघर्षच वाढविला आहे. त्यामुळे आज भाऊ-भाऊ व देश-देश एकमेकांविरुद्ध लढण्यास उभे राहिलेले दिसत आहेत.

उपरोक्त परिणामांवरून स्पष्टच होते की, कोणत्याही प्रकारच्या क्रांतीने शांती प्राप्त होणे सुतराम संभवत नाही. **व्यक्तीच्या जीवनात आध्यात्मिक क्रांती घडवून आणल्यानेच शांती होईल. जोपर्यंत मनुष्यात्म्यात पारस्परिक प्रेम, सहानुभूती, कल्याणाची भावना, करुणा, अहिंसा, ईश्वरनिष्ठा इत्यादी गुण उतरणार नाहीत तोपर्यंत शांती स्थापन होणे त्रिवार शक्य नाही. माणसाला देवता बनविण्याचे 'आध्यात्मिक कारखाने' देशात जोपर्यंत उभारले जाणार नाहीत तोपर्यंत अन्य कोणत्याही उपायाने कायद्यांचे अस्तित्व टिकविण्याची समस्या, माणसाने माणसाचे शोषण करण्याची समस्या किंवा अशांती निर्माण करणाऱ्या अन्य कोणत्याही स्थितीची सुधारणा होणे त्रिवार शक्य नाही.**

हा केवळ सिद्धांत नव्हे तर अनुभवसिद्ध गोष्ट आहे. परमपिता शिव परमात्म्याच्या आदेश व निर्देशानुसार भारतात व अखिल विश्वात आध्यात्मिक क्रांती घडवून आणण्यासाठी भारताच्या अनेक शहरांतून जी 'प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालयाची' सेवा-केंद्रे स्थापन झाली आहेत, त्यांच्या अविरत प्रयत्नांनी अनेक मनुष्यात्म्यांना खऱ्या शांतीचा लाभ झाला आहे कारण त्यांच्या जीवनात पवित्रता आलेली आहे. निश्चितच हा ईश्वरी संदेश व उपदेश चारीही दिशांत पसरेल आणि या आध्यात्मिक क्रांतीने खरी शांतीही स्थापन होईलच होईल.

# योग, विज्ञान आणि मनोविज्ञान

**आ**ज विज्ञानाच्या चमत्कारांचा लोकांवर फार मोठा प्रभाव पडलेला आहे. विज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांनी गेल्या सुमारे दीडशे वर्षात जी अभूतपूर्व प्रगती केली आहे ती गेल्या दोन हजार वर्षातही झाली नाही. विज्ञानाच्या या शीघ्रगती विकासामुळे माणसाला अनेक भौतिक सुखसोयींची साधने उपलब्ध झाली आहेत. या सर्व सुखांची एक लांबलचक यादी तयार करता येईल. यादीतील ती सुखे जर काही शीर्षकांखाली लिहावयाची म्हटली तर ती मुख्य शीर्षके पुढीलप्रमाणे असतील–

(१) स्वास्थ्य व स्वच्छता किंवा रोग-चिकित्सा व आयुष्यमान यांत वाढ करण्यासंबंधी, (२) वाहतूक व कार्य शीघ्रतेने व सुयोग्यरीतीने परिपूर्ण करण्यासंबंधी, (३) उत्पादनात वाढ करणे, मालांत फेरफार किंवा सुधारणा करणे जसे त्यांचा दर्जा उंचावणे यासंबंधी, (४) माणसाला करमणुकीची, सजावटीची, कृत्रिम शृंगाराची, सौंदर्य प्रसाधनाची व क्षणभंगूर आनंद देणारी साधने देण्यासंबंधी, (५) माहिती–प्रसारण, प्रचार, बातम्यांची व विचारांची देवाणघेवाण आणि प्रकाशन यांसंबंधी, (६) शोध (Invention)संशोधन (Research) अन्वेषण (Discovery)व ज्ञान प्राप्त करण्याची कार्ये पुढे चालू ठेवण्यासंबंधी.

**या सर्व शोधांमुळे जगाची परिस्थिती सुधारली आहे का?**

विज्ञानाने उपरोक्त सहा मुख्य शीर्षकांच्या अंतर्गत माणसाच्या सुख-सोयीसाठी जी सामग्री एकत्रित केली आहे, तिच्यामागे कोट्यवधी व्यक्तींचे आयुष्यभर केलेले कठोर परिश्रम आहेत आणि त्यावर किती पैसा व वेळ (man-hours)खर्च झाला आहे त्याचा काही हिशेबच नाही. असे असूनही जगाची परिस्थिती काही फारशी सुधारलेली दिसत नाही. माणसाच्या व्यवहारात तर मुळीच परिवर्तन घडलेले नाही उलट त्याची अधोगतीच झालेली आहे आणि नित्य नव्या नव्या प्रकारचे रोग, कष्ट, दुःख किंवा अशांतीची कारणे त्याच्या सामोरी येत आहेत. लोकांच्या जीवनात कृत्रिमपणा आलेलाआहे, अनाचार व अत्याचार वाढले आहेत. माणसाचा स्वभाव जास्तच कुटिल व आसुरी बनलेला आहे आणि

जगात वैमनस्य, दारिद्र्य, बेकारी, दुःख इत्यादींत सुधारणा झालेली नाही.

## एक अन्य अद्भुत विज्ञान व त्याची फलश्रुती

परंतु एक विज्ञान असेही आहे की, ज्याद्वारे सुख प्राप्त करण्याठी एका फुटक्या कवडीचाही खर्च येत नाही व शेकडो वर्षे कठोर परिश्रम करण्याचीही जरूरी लागत नाही. ते विज्ञान एकटेच आपणास उपरोक्त सहाही प्रकारची सुखे प्राप्त करण्यायोग्य बनविते. या विज्ञानामुळे सृष्टीचे स्वरूप, आचार, व्यवहार, विचार, परंपरा सर्वकाही पार बदलून जातात. त्यामुळे सृष्टीवर कोणीही दुःखी होत नाही व कोणास दुःखही देत नाही. कष्टदायी चालीरीती किंवा नेम-धर्म यांचाही मागमूस राहत नाही. त्या विज्ञानाचे नाव आहे 'योग'. त्याचे शिक्षण गीतेचा भगवान स्वतः अवतरित होऊन देतो. त्याद्वारे माणूस अमर देवपद व निरोगी काया प्राप्त करून घेतो. वाहतुकीसाठी त्याला पुष्पकासारखी विमाने मिळतात. त्या विज्ञानाद्वारे स्थापन झालेल्या नव्या युगात सर्व वस्तूंचे उत्पादन इतक्या मुबलक प्रमाणात व इतक्या श्रेष्ठ प्रतीचे होत असते की, माणसाला कोणत्याही पदार्थाची कधीही वाण पडत नाही. त्या युगाला 'सुखधाम', 'वैकुंठ' किंवा 'स्वर्ग' म्हटले जाते. त्या विज्ञानाद्वारे माणसाला निसर्गतःच पूर्ण सौंदर्य प्राप्त होते व मनोरंजनाची असंख्य दिव्य साधने उपलब्ध होतात. सांगण्याचा मथितार्थ हा आहे की, भौतिक विज्ञानाच्या विकासामुळे उपलब्ध होणारी उपरोक्त सहा शीर्षकांखालील सुख-सोयीची सर्व साधने योगरूप विज्ञानाद्वारे अत्यंत सहज, दिव्य व सर्वहितकारीरीत्या प्राप्त होतात.

## योगाद्वारे उत्कृष्ट ज्ञानाची प्राप्ती

विज्ञान माणसाला सृष्टीच्या ज्या गूढ रहस्यांचा बोध करवून देते आणि माहिती मिळण्यासाठी व तिचे प्रसारण करण्यासाठी जी यंत्र–सामग्री किंवा साधने प्रदान करते त्यापेक्षा कितीतरी अधिक ज्ञान (माणसासंबंधी तसेच सृष्टीसंबंधी लाभप्रद माहिती) योगरूप विज्ञानाद्वारे माणसाला प्राप्त होते. योग माणसाला सूर्य व तारांगणाच्याही पलीकडील लोकांचेही (worlds)ज्ञान सहजपणे करून देतो आणि जग किंवा समाजापुढे येणाऱ्या परिस्थितींचा आगाऊ साक्षात्कारही घडवितो. शास्त्रज्ञ (scientists) आकाशात उपग्रह (satellits) सोडून

त्यांच्याद्वारे माहितीचे प्रसारण करतात व भावी परिस्थिती आधीच जाणून घेण्यात समर्थ होतात. परंतु योगी त्रिकालज्ञ व त्रैलोक्यज्ञ परमात्म्याशी संबंध प्रस्थापित करून सर्वकाही जाणून अत्यंत गुंतागुंतीची यंत्रसामग्री बसविलेल्या व अतिशय वेगवान अशा अग्निबाणांद्वारे (Rockets)शास्त्रज्ञ जेथे जाऊन पोहोचतात, तेथे योगी दिव्य-प्रज्ञा (दिव्य-बुद्धी) किंवा ऋतंभरा (पवित्र व सत्यदर्शी) बुद्धीद्वारे क्षणार्धात सहजपणे जाऊन पोहोचतात. शास्त्रज्ञांकडे दूरदर्शन (Television)), दूरदर्शक (Telescope) बिनतारी यंत्र (Wireless)) इत्यादी साधने आहेत. परंतु योग्यांकडील दिव्यदृष्टी त्यांच्यापेक्षाही फार उत्तम व सूक्ष्म रूपाने कार्य करते.

तसेच, विज्ञानाचे जे महत्त्वपूर्ण, अद्‌भुत व लाभकारी शोध आहेत त्यांत अणु-भट्टी (Atomic Reactor) विद्युत-चुंबकीय रचना (Electro-Magnetic System)) व त्याद्वारे दूर-नियंत्रण (Remote Control) आणि अणू व त्याहूनही सूक्ष्म विद्युत्‌कणांचे त्याचप्रमाणे शक्तीच्या स्वरूपांचे (ध्वनी, चुंबकत्व, प्रकाश, उष्णता इत्यादी) ज्ञान किंवा तत्संबंधी शोध यांचा समावेश होतो. अगदी तशाच प्रकारचे अध्ययन-क्षेत्र किंवा अनुभव-क्षेत्र योगरूपी विज्ञानाचेही आहे. योगरूपी विज्ञान अणुहूनही सूक्ष्म असा जो 'आत्मा' आहे त्याचा बोध व अनुभव करविते.ते अशी एक प्रखर भट्टी तयार करते की, ज्यात आत्म्याचे जन्मोजन्मींचे अशुद्ध संस्कार जळून खाक होतात व आत्मा शुद्ध होतो. हे विज्ञान पारमात्मिक शक्ती प्राप्त करवून देते आणि ज्योती (Light)व शक्ती (Might) यांचा जणू पुंजच अशा परमात्म्याची अनुभूतीही करवून देते. शरीर-विज्ञान जसे शरीराच्या रचनेच्या (Anatomy of the body)बोध करून देते तसेच योग-विज्ञान मन-बुद्धी-संस्काररूपी आत्मिक कार्यशक्तींचे (Faculties) ज्ञान करविते.

### योग हे एक उत्तम मनोविज्ञान आहे

वर सांगितल्याप्रमाणे विज्ञानाचे इतके शोध लागूनही आज माणसाच्या मनाला शांती नाही, उलट मानसिक रोग व दुःख यांत बेसुमार वाढ झालेली दिसते. माणूस क्षणार्धांत आपला मानसिक समतोलपणा (Mental Balane) गमावून बसतो, उत्तेजित (Excited) होतो, भयभीत होतो, हैराण होतो,

जळफळतो, किंकर्तव्यमूढ होतो किंवा गोंधळल्यागत होतो. हा सारा मानसिक गोंधळ, ताण (Tensions)गंड (Mental Complexes)असमतोलपणा (Mental imbalance) भावनात्मक क्षुब्धता (Emotional Disturbances) वर्तणुकीतील दोष (Behaviour defects) इत्यादी सुधारणारे मनोविज्ञान (मानसशास्त्र) व त्याची एका विशिष्ट शाखा मनोविश्लेषण (Psycho-analysis) व मानसिक रोगांवर इलाजकरणारी चिकित्सा (Psychiatry)इत्यादींचा विकास झाला आहे, परंतु त्यामुळे माणसाचे जीवन काय सुखी झाले आहे? त्याचा स्वभाव व व्यवहार सुरळीत (Normal)झाले किंवा सुधारले आहेत? माणसाचे चारित्र्य व मानसिक समतोलपणा यात काहीच प्रगती झालेली दिसत नाही.

उलटपक्षी, योगरूपी विज्ञान माणसास ना केवळ मन, बुद्धी, संस्कार, स्वभाव, आचरण, चारित्र्य इत्यादीसंबंधित अद्भुत ज्ञान देते तर त्याच्या प्रवृत्तींचे (Instincts) मार्गांतरीकरण (Redirection) व (Sublimation)करून त्याचे व्यवहार व वर्तन सुधारते आणि त्याचे संस्कार सत्त्वप्रधान बनवून त्याला देवतुल्य करते. योगरूपी विज्ञान माणसाच्या भावना (Emotions) नियंत्रित तर करतेच पण त्याच्या विचारांतील गुंतागुंत नाहीशी करून्र त्यांत ऋतुजा आणते. या विज्ञानाद्वारे माणसाची मानसिक एकाग्रता (Power of concentration)वाढते आणि त्याला एका स्थायी शांतीचा व एका दिव्य आनंदाचा (ज्याला 'नारायणी नशा' म्हणतात) सदैव अनुभव होत राहतो. त्याच्या आचार–विचारांत परिवर्तन घडून आल्याने त्याच्या मनात लोकांविषयी तेढ, द्वेष, मत्सर, क्रोध व नाखुषी उत्पन्न होत नाहीत, त्याच्या मनाला भावनावेगाची भरती–ओहोटी लागत नाही, तसेच मानसिक ज्वरही त्याच्या मनात निर्माण होत नाहीत. उलट त्याला स्थितप्रज्ञ, एकरस अथवा आनंदमय अवस्था प्राप्त होते.

## सर्व प्राप्तींचे मूळ

अशा प्रकारे, रसायन-विज्ञान (Chemistry) पदार्थ-विज्ञान (Physics) वनस्पती-विज्ञान (Botany) प्राणी-विज्ञान (Zoology)

वैद्यक-विज्ञान (Medical Science) इत्यादी सर्व विज्ञानांद्वारे माणसाचे जीवन उन्नत, विकसित व सुखसोयींनी परिपूर्ण व्हावे या उद्देशाने कठोर परिश्रम केले जात आहेत परंतु हे सर्व उद्देश योगरूपी विज्ञानाद्वारे विनासायास सफल होतात. रसायन-विज्ञानाचा प्रारंभ माणसाला अमर बनविणारे अमृत व लोखंडाला सोने बनविणारा परिस यांचा शोध लावण्याच्या हेतूने झाला असे म्हणतात. परंतु इतके कठोर परिश्रम करूनही अद्याप ते शक्य झालेले नाही. परंतु योगरूपी विज्ञानाद्वारे हे एका दृष्टीने शक्य कोटीत आणणे सोपे आहे. योगाद्वारे माणूस अमरत्व म्हणजे देवपद प्राप्त करू शकतो. याचा अर्थ असा नव्हे की, तो शरीराचा कधी त्याग करीत नाही ; तर देवतुल्य पवित्र बनल्यानंतर पूर्ण आयुष्य भोगून शेवटी तो आपल्या देहाचा त्याग दुःखाने पीडित न होता सापाने कात टाकावी त्याप्रमाणे सुखेनैव व स्वेच्छेने करतो. तसेच योगाद्वारे कलियुग (लोहयुग- Iron Age) बदलून सत्ययुग (सुवर्णयुग- Golden Age) येते. म्हणजे योगरूपी विज्ञान हे लोखंडाला (लोहाला) सोने (सुवर्ण) बनविण्यात अर्थात तमोगुणी माणसाला सत्त्वगुणी बनविण्यात परिसाचे कार्य करते.

योगाचे लाभ जितके सांगावेत तितके थोडेच आहेत. असे कोणतेही सौख्य नाही की, जे योगरूपी विज्ञानाद्वारे प्राप्त होत नाही. ही गूढ अध्यात्मविद्या किंवा सूक्ष्मातिसूक्ष्म विज्ञान आत्मसात केल्यास माणसाला सर्व काही प्राप्त होते, त्याची कोणतीही इच्छा अपूर्ण राहत नाही. परंतु दुःखाची गोष्ट आहे की, ज्या भारतात अवतरित होऊन परमपिता परमात्मा स्वतः ही गुह्यतम विद्या शिकवित आहे, तेथील लोक आज त्याकडे कानाडोळा करीत आहेत. त्याला नाके मुरडीत आहेत. अजूनही संधी आहे. तेव्हा या सुवर्णसंधीचा पुरेपूर लाभ घेऊन जर भारतातील लोक ही विद्या आत्मसात करतील तर भारत जगातील सर्व देशांचा मुकुटमणी बनेल व येथील दुःख, दारिद्र, आसुरी प्रवृत्ती व प्राकृतिक प्रकोप इत्यादी सर्व काही दूर होतील.

# धर्म आणि विज्ञान

# (२)

**गे**ल्या सुमारे दोनशे वर्षांत विज्ञानाने मानवी जगात बरेच परिवर्तन घडविले आहे. विज्ञानाने अशी काही भौतिक साधने निर्माण केली आहेत की, त्यामुळे माणसाचे खाणेपिणे, राहणीमान, वाहतूक व पारस्परिक संपर्क तसेच व्यवहार-व्यापार यांच्या पद्धतींमध्येही आमूलाग्र परिवर्तन झालेले दिसत आहे. सर्वपक्षी झालेली ही विज्ञानाची प्रगती पाहून आणि त्याद्वारे आश्चर्यकारक व कालपर्यंत असंभवनीय समजल्या गेलेल्या गोष्टी शक्य कोटीत आलेल्या पाहून लोक अत्यंत प्रभावित झालेले आहेत. त्याचप्रमाणे विज्ञान ज्या पद्धतीचा अवलंब करून संशोधन करते किंवा एखाद्या निष्कर्षाला येऊन पोहोचते ती पद्धतीही आज फारच लोकप्रिय झालेली आहे. वैज्ञानिक (Scientist)जे काही सिद्धांत मांडतो ते प्रयोगाने सिद्ध करून दाखवितो. विज्ञानाच्या या अध्ययनपद्धतीमुळे निरनिराळ्या देशांतील वैज्ञानिकांचे एखाद्या विषयावर बहुधा एकमत होते. याचा सामान्य लोकांवर फारच चांगला प्रभाव पडतो.

## विज्ञानाचा अंधश्रद्धेवर आघात

उलटपक्षी, गेल्या दोन शतकांत जगामध्ये धर्माचा प्रभाव कमी झालेला दिसत आहे. धार्मिक बाबींना तिलांजली देणाऱ्या लोकांचीच संख्या क्रमवार वाढत गेली आहे. एवढेच नव्हे तर धर्मनिष्ठांमध्येही दृष्टिकोन, धर्मपालन, आचरण व साधनापद्धती यांबाबतीत थोडाफार फरक पडलेला आढळतो. या परिवर्तनात विज्ञानाचाही हात आहे. विज्ञानाने कित्येक जुन्या धार्मिक समजुती चुकीच्या म्हणून सिद्ध केल्या आहेत. परिणामतः लोकांच्या मनात हा एक विचार उत्पन्न झाला आहे की, कित्येक धार्मिक समजुती अंधश्रद्धेवर तरी आधारलेल्या असल्या पाहिजेत किंवा शास्त्रांत त्या, ज्या भावनेने लिहिल्या गेल्या आहेत त्या भावनेचा कोणाला बोध झाला नसावा. म्हणून आज ती अतूट धर्मश्रद्धा फार थोड्या लोकांतच आढळते. उदाहरणार्थ, विज्ञानाने हे सिद्ध करून दाखविले आहे

की, कित्येक धर्म पूर्वी मानत आलेले आहेत त्याप्रमाणे चंद्रावर स्वर्गलोक नाही, पृथ्वी चपटी नसून गोल आहे, शेतात जी पिके येतात किंवा मातेच्या गर्भातून जे मूल जन्माला येते त्यांची उत्पत्तिही वैज्ञानिक नियमांनुसारच होते ;यात आश्चर्य करण्याची किंवा त्यामागे एखाद्या रहस्यपूर्ण दैवी शक्तीचा हात असावा असे मानण्याची आवश्यकता नाही. कित्येक धार्मिक आचार्य किंवा धर्मशास्त्र पूर्वी हा दृष्टांत देत असत की, ज्याप्रमाणे शेणातून किडे उत्पन्न होतात किंवा कोळी आपल्या मुखातून जाळे बाहेर काढतो त्याचप्रमाणे जडातून चेतन आणि चेतनापासून जड निर्माण होऊ शकते. वस्तुतः विश्वाचे मूळ तत्त्व एकच आहे. परंतु विज्ञानाने सूक्ष्मदर्शक यंत्राद्वारे सिद्ध करून दाखविले की, शेणात किडे सुरुवातीपासूनच असतात व ते आपला खुराक खाऊन वृद्धिंगत होतात. अशाप्रकारे, बऱ्याच गोष्टींवर विज्ञानाने प्रकाश टाकला आहे. या व्यतिरिक्त आपले सिद्धांत प्रयोगाने सिद्ध करण्याची जी वैज्ञानिक पद्धती आहे त्यामुळेही आज लोकांच्या विचार करण्याच्या पद्धतींतही बराच फरक पडलेला आहे आणि ते जागरूक झालेले आहेत. आता ते प्रत्येक गोष्टीचा प्रत्यक्ष पुरावा मागतात व त्याचे प्रत्यक्षात फळ पाहू इच्छितात.

हेही सत्य आहे की, विज्ञानाने जीवनाची गती इतकी तीव्र केली आहे आणि यंत्रे व साधने इतक्या विपुल प्रमाणात निर्माण केली आहेत की, कर्मकांडात किंवा पूजापाठांत पूर्वीप्रमाणे गढून जाण्याइतका वेळही लोकाना आज मिळत नाही. तसेच गेल्या काही शतकांपासून धर्माच्या नावाखाली जे दंगेधोपे किंवा युद्धे होत आली आहेत त्यामुळेही लोकांचा धर्मावरील विश्वास उडाला आहे. विशेषतः धर्मप्रचारक किंवा धर्माचार्य यांच्या मतप्रतिपादनांत एकवाक्यता नसून मतभेदच आहेत, हे पाहून शेवटी खरे मत कोणते ? याबाबतीत लोकांच्या मनांत एक प्रकारचा गोंधळ निर्माण झाला आहे. त्यामुळे त्यांना वाटू लागले आहे की, धर्मज्ञान कदाचित सत्य नसावे. अन्यथा वैज्ञानिकांप्रमाणे धर्माचार्यांचेही एकमत झाले असते. यामुळे ही एक नसती उठाठेव समजून कित्येक लोकांनी धर्माकडे पाठ फिरविली आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की जगात आज धर्म लयाला गेला

आहे किंवा आज त्याची आवश्यकता नाही! असत्यता व अंधश्रद्धा ही काही खऱ्या धर्माची नीती नव्हे. धर्माच्या महत्त्वावर विचार करण्यापूर्वी धर्म म्हणजे काय अर्थात 'धर्म' या शब्दाचा वास्तविक अर्थ काय आहे हे पाहावयास हवे.

## धर्माचा संबंध कर्माशी आहे.

वास्तविक, धर्माचा अर्थ आहे धारणा. त्यामुळे आपले कर्म श्रेष्ठ होईल व समाजाच्या जीवनात सुख-शांतीची वेल फळा-फुलांनी बहरलेली राहील अशा प्रकारची जीवनात केलेली धारणा म्हणजेच 'धर्म' होय. धर्म हे काही एखाद्या बाह्य रूपरेषेची किंवा शृंगाराचे नाव नव्हे, तर त्याचा संबंध माणसाच्या कर्मांशी किंवा त्याची दृष्टी, वृत्ती व मानसिक स्थिती यांच्याशी निगडित आहे. माणसाचे वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक जीवनाचे कार्य सुरळीत चालावे, सर्वांशी त्याचे नाते बंधुत्वाचे व दृष्टिकोन कल्याणकारी राहावा, प्रभु-प्रेम कायम टिकून त्याची वृत्ती सात्त्विक राहावी म्हणून धर्म त्याला त्याच्या कर्तव्याची जाणीव करून देतो. अशा रीतीने कोणता धर्म हे कर्तव्य करीत नसेल तर तो धर्मच नव्हे किंवा त्यात काहीतरी त्रुटी असण्याची शक्यता आहे.

## उभयताचे कार्यक्षेत्र वेगवेगळे

विज्ञानाचे आपले वेगळेच अध्ययनक्षेत्र किंवा कार्य-क्षेत्र आहे. विज्ञान प्रकृती, प्राकृतिक शक्ती, घडामोडी किंवा परिणाम यांचे अध्ययन करते. ते माणसाला भौतिक सुखांची प्राप्ती करवून देते. तेव्हा, विज्ञानाचे आपले असे महत्त्व व स्थान आहे. धर्म माणसाला पारलौकिक किंवा प्रकृतीच्या पलिकडील क्षेत्रात घेऊन जातो. तो माणसात आत्म्याविषयी आकर्षण निर्माण करतो व आपापसांत आत्मिक नाते प्रत्यक्षात जुळवून विश्वबंधुत्वाची भावना उत्पन्न करू इच्छितो, त्याचे हे कार्य फलरूप झाले आहे की नाही ही गोष्ट वेगळी. धर्म माणसाचे व्यवहार, आचार-विचार इत्यादींसाठी काही नियम किंवा मर्यादा निश्चित करतो आणि त्याच्यापुढे एक श्रेष्ठ उद्दिष्ट ठेवून त्याला महान बनण्याची प्रेरणा देतो. तो त्यांचे नाते परमात्म्याशी जोडून त्याला अतींद्रिय सुखाचा किंवा आनंदावस्थेचा अनुभव करवू इच्छितो. विज्ञान माणसाच्या इच्छा पूर्ण करण्याची

साधने शोधत असते परंतु धर्म माणसाच्या इच्छा नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा विचारांती हाच निष्कर्ष निघतो की, धर्म आणि विज्ञान हे एकमेकांना पूरक आहेत व दोघांचीही माणसाला आवश्यकता आहे. विज्ञान सुखासाठी तर धर्म सदाचार व शांतीसाठी.

**वैज्ञानिक पद्धतीने धर्माचे अध्ययन**

या व्यतिरिक्त आमच्या अनुभवाप्रमाणे धर्माचे अध्ययनही वैज्ञानिक पद्धतीने होऊ शकते. 'आत्मा' हा धर्माचा विषय आहे व तो इंद्रियातीत व सूक्ष्म पदार्थ असल्याने त्याच्या अध्ययनासाठी कोणतीही स्थूल वैज्ञानिक साधने वापरता येत नाहीत परंतु वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग करता येणे शक्य आहे. आम्ही असे मानतो की, खरा धर्मसुद्धा एकच आहे अर्थात धर्मज्ञानाचे खरे निष्कर्षही एकच आहेत आणि ते विवेकसंपन्न व तर्कशुद्ध आहेत. जी धार्मिक मते अशा प्रकारची नसतील ती अपूर्णच म्हणावी लागतील. त्यांचे उगमस्थान परमात्मा नव्हे तर अल्पज्ञ मनुष्यच आहे असेच म्हणावे लागेल.

या सर्व गोष्टींचे अवलोकन करून आमचे असे ठाम मत झाले आहे की, माणसाला धर्माची आवश्यकता आहे. अन्यथा तो माणुसकीला पारखा होतो. काही वर्षांपूर्वी आम्ही अमेरिका, युरोप व आशियातील दहा देशांतून ईश्वरी सेवा करण्यासाठी भ्रमण केले होते. तेथील अनुभवांवरून आम्हाला असे वाटते की, खऱ्या धर्माकडे पाठ फिरविल्याने आज माणूस शांती गमावून बसला आहे. त्याचप्रमाणे तो वासनायुक्त, विलासप्रिय व भोगोन्मुख होत चालला आहे. याचे घातक परिणामही स्पष्टपणे दृग्गोचर होत आहेत. माणसाला आज अनेक भौतिक सुखांची प्राप्ती झालेली असूनही त्याच्या मनावरील ताण तसाच आहे.तो मादक पदार्थ व मनोरंजनाची कृत्रिम साधने शोधत भटकत आहे आणि अनेक मानसिक रोगांनी पछाडलेला आहे. हे सर्व, धर्म सोडल्यानेच झालेले आहे. ही त्याची फार गंभीर चूक आहे. विज्ञान व विवेकयुक्त धर्म हे जणू माणसाचे दोन पायच होत. दोन्ही आवश्यक व शोभनीयही आहेत. पण त्यांचे विकृत स्वरूप मात्र समाजाला घातक आहे.

## धर्माची आवश्यकता

आज खऱ्या धर्माच्या अभावामुळे विज्ञानाने मानवी समाजाला फार मोठा धोका निर्माण केला आहे. त्याने आण्विक अस्त्रशस्त्रे निर्माण करून जगाला विनाशाच्या उंबरठ्यावर उभे केले आहे. माणसाला चंद्रावर उतरविण्यात जरी विज्ञान यशस्वी झालेले असले तरी त्याच्या मनाला चंद्राची शीतलता मात्र ते देऊ शकलेले नाही. विज्ञानाने यंत्रे, कारखाने इत्यादींची भरमसाट निर्मिती केली आहे आणि प्राकृतिक शक्तींनाही वश करून घेतले आहे परंतु माणूस आपल्या मनाला किंवा कर्मेंद्रियांना काही काबूत आणू शकलेला नाही. त्याचा दुष्परिणाम म्हणजे तो दानव बनत चालला आहे. म्हणून आज धार्मिक शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे अन्यथा विज्ञान भस्मासूराप्रमाणे स्वतः उपलब्ध केलेली सुखसाधने भस्म करून टाकील.

एकीकडे लोक धर्म-विमुख होत चालले आहेत हे पाहून आम्ही निराश होतो तर दुसरीकडे सत्य धर्माच्या पुनर्स्थापनेचे ईश्वरी कार्य मोठ्या जोमाने व उत्साहाने होत असलेले पाहून आमच्या मनात आशेचा किरण डोकावतो. **प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालयाद्वारे** निर्मित ज्या आध्यात्मिक प्रदर्शनाचे आयोजन आम्ही इतर देशांत केले त्याचे उत्साहजनक परिणामही पाहिले. या ईश्वरी विश्व-विद्यालयाचे मुख्य उद्दिष्टच मुळी धर्माद्वारे श्रेष्ठ आचरण योगाद्वारे ईश्वरानुभूती व ज्ञानाद्वारे समाज-कल्याण करून एक असा नवा समाज निर्माण करणे आहे, ज्यात विज्ञान व धर्म एकमेकांना पोषक असतील आणि लोक सुख-शांतीने संपन्न असतील. सत्ययुगी समाजाच्या स्थापनेचे हे ईश्वरी कार्य शीघ्रतेने होत असलेले दिसत आहे.

# धर्म आणि अध्यात्म यांचे स्वरूप व समभावना

**म**नुष्यात्म्याला विकारांच्या बंधनातून मुक्त करून शुद्ध व सुदृढ बनविण्यासाठी आध्यात्मिक पुरुषार्थ हा एक रामबाण उपाय आहे. ज्याप्रमाणे शारीरिक रोगावर इलाज करण्यापूर्वी रोग्याची केवळ अवस्था नव्हे तर वेळ व स्थान यांचाही विचार करून औषधोपचार केला जातो त्याचप्रमाणे विकृत आत्म्यावर म्हणजे विकृत मानवी संस्कारांवर उपचार करताना त्याची मनःस्थिती व बाह्य परिस्थिती यांचाही विचार करणे आवश्यक आहे. व्यक्ती समाजाचा एक घटक आहे. व्यक्तीचा जसा समाजावर प्रभाव पडतो तसा समाजाचाही प्रभाव व्यक्तीवर पडतो. म्हणून व्यक्तीचा आध्यात्मिक पुरुषार्थ समाजापासून मुळीच वेगळा करता येणार नाही. जेथे व्यक्तीची आध्यात्मिक चेतना जागृत करण्याची आवश्यकता आहे तेथे तिला समाजाच्या उत्थानाचे माध्यम बनणे जरूरीचे आहे. तेव्हा अध्यात्म हा केवळ एक व्यक्तिगत विषय नसून त्याकडे समाजशास्त्राचेच एक अंग म्हणून पाहावयास हवे. या पार्श्वभूमीवर आपण पाहू या की, आज आध्यात्मिक क्षेत्रात माणूस काय करीत आहे व कोणत्या उद्देशाने प्रेरित होऊन करीत आहे, त्यामुळे त्याची व्यक्तिगत किंवा समाजाची गरज कितपत पूरी होत आहे आणि जगाच्या अत्यंत बिकट समस्यांचे निराकरण करण्याची शक्ती ज्यात अंतर्भूत आहे त्या अध्यात्माचे खरे शक्तिशाली स्वरूप कोणते आहे?

## व्यक्तिवादी अध्यात्म

निरनिराळे धर्मसंप्रदाय आणि त्यांच्या शाखोपशाखा आपापल्या रूढी व समजुती अनुसार जे काही करीत आहेत त्यांत कितीतरी विभिन्नपणा आढळतो. परंतु सध्या त्यांचे जे प्रचलित स्वरूप आहे त्याची विस्ताराने दोन भागात विभागणी करता येईल. एक आहे 'भक्ती' व दुसरा 'कर्मसंन्यास.'

भक्तिमार्गात भक्त हा देवी-देवता, गुरु-गोसावी, साधु-संत, पीर-पैगंबर इत्यादींपैकी कोणावर तरी श्रद्धा ठेवून त्यांची पूजा करीत आहे आणि बहुधा

कर्मकांडावरच त्याचा अधिक भर आहे. मनोविकारांनी ग्रासलेला माणूस भयभीत होऊन एका दृश्य वा अदृश्य सत्तेच्या शक्तीचा एक संरक्षक छत्र (Defence Umbrella) म्हणून उपयोग करू इच्छित आहे. आपण देवी-देवता, गुरु-गोसावी, पीर-पैगंबर इत्यादींना प्रसन्न करून घेतले तर आपली संतती व संपत्तीची क्षणिक मनोकामना सहज पूर्ण होईल अशी त्याला आशा वाटत असते. तसे आपण न केल्यास ते कोप पावतील व आपले काहीतरी अनिष्ट घडेल याचेही त्याला भय वाटते. अशा प्रकारचा तथाकथित आध्यात्मिक पुरुषार्थ, आशा व भय यांच्या आधारे दुसऱ्यांच्या कृपेची याचना करीत असतो. आत्मशक्ती प्राप्त करून स्वतः शक्तिशाली बनत नाही. ज्याच्यात स्वतःच्या समस्यांचे निराकरण करण्याची पात्रता नाही तो समाजाच्या समस्यांचे निराकरण ते काय करणार?

दुसऱ्या प्रकारचा आध्यात्मिक पुरुषार्थ जो 'कर्मसंन्यास,' त्यात समाजाला कोणतेच स्थान नाही. कर्मसंन्यासी शरीर व जग यांना स्थायी व अपरिवर्तनीय रूपाने दुःख व अशांतीचे माहेरघर समजून त्यांपासून संपूर्ण मुक्त होण्यालाच आपले साध्य मानतात. जन्ममरणाच्या फेऱ्यातून कायमचे मुक्त होणे हे त्यांच्या मते सर्व मानवी समस्यांपासून मुक्त होण्याचा एकमेव उपाय आहे, यासाठी ते समाज व कार्यप्रवण जग सोडून जंगलात व गिरिकंदरात जाऊन स्वतःला कोंडून घेतात. स्वतःला निर्विकल्प करण्यासाठी ते समाधी वगैरेंचा साधना म्हणून अवलंब करतात.

उपरोक्त दोन्ही प्रकारचे प्रचलित आध्यात्मिक पुरुषार्थ संपूर्णपणे व्यक्तिवादी आहेत. उभयतांपैकी एकानेही समाज सुदृढ व सुखशांतिसंपन्न करण्यासाठी अद्याप काहीही योगदान केलेले नाही आणि यापुढेही ते तसे काही करतील अशी आशा नाही. भक्तिमार्ग हा तर पूर्णपणे 'संकुचित व्यक्तिगत स्वार्थावर' आधारलेला असल्याने सामाजिक समस्यांचे निराकरण करण्याची पात्रता त्यात असणे संभवत नाही. अंधश्रद्धेवर पोसलेला असल्यामुळे स्वतःलाही तो समाजाचे एक शक्तिशाली अंग बनवू शकत नाही. तो अत्यंत संकुचित क्षेत्रात व्यक्तिगत स्पर्धेच्या रूपाने वाढत असतो. संन्यासमार्ग तर समाजालाच काय पण

स्वतःलाही 'अस्तित्वहीन' करण्याचे उद्दिष्ट बाळगतो. त्यामुळे सामाजिक सुधारणा किंवा सामाजिक समस्यांचे निराकरण याबाबतींत तो उदासीन असतो. अशा रीतीने हे दोन्ही आध्यात्मिक मार्ग समाजाचे कल्याण करण्यास असमर्थ ठरले आहेत. त्यामुळेच ते विद्यमान असूनही समाजाचे नैतिक व चारित्रिक अधःपतन होत आले आहे.

## जगाची सध्याची परिस्थिती

सध्या जगाची परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची व भीषण झालेली आहे. माणूस जितका विज्ञान व तंत्रज्ञानात प्रगती करीत आहे आणि जुन्या आर्थिक, सामाजिक व राजकीय चौकटी बदलण्यासाठी त्याने जितका लढा दिला व यश प्राप्त केले तितकेच जग व त्याचे प्रत्येक अंग अधिकच गुंतागुंतीच्या समस्यांमध्ये गुरफटत चालले आहे. आज जग एका चवाठ्यावर (cross-road) 'किंकर्तव्यमूढ' स्थितीत उभे आहे. कोठे जावे हे त्याला कळेनासे झाले आहे. सर्वत्र भीतीचे सावट पसरलेले आहे. आपण एका ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेलो आहोत असा जग अनुभव करीत आहे. कोणत्या क्षणी अग्नीची भीषण ज्वाळा वर उफाळून येऊन त्याला भस्मीभूत करील याचा काही नेम नाही. भौतिक सौख्याची विपुल साधने संग्रही असलेला माणूस स्वतःला असुरक्षित समजत आहे. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर विषादाची छाया स्पष्ट दिसत आहे. प्रत्येकाच्या अंतःकरणात अशांतीचे वादळ थैमान घालीत आहे. आर्थिक, राजकीय, औद्योगिक वैज्ञानिक व सामाजिक अशा सर्व प्रकारच्या क्रांत्यांच्या परिणामाने हताश होऊन माणूस आध्यात्मिक-क्रांतीकडे क्षीण आशेने पाहात आहे. 'क्षीण' का ? कारण आजपर्यंत केलेले सर्व आध्यात्मिक प्रयत्न निष्फळच ठरलेले आहेत. धर्माच्या नावाखाली अधर्मच जास्त बोकाळला आहे. सांप्रदायिकत्वाच्या विषाने वैमनस्यच वाढविले आहे त्यामुळेही लोक निराश व हतबल झालेले आहेत परंतु तरी देखील आशेचा किरण येथेच दिसत आहे. कारण हे तर निर्विवाद आहे की सर्व समस्यांचे निराकरण माणसाच्या मनोवृत्तीत आमूलाग्र परिवर्तन घडविल्यानेच होऊ शकते आणि वृत्तीत मूलभूत परिवर्तन घडविणे हे तर अध्यात्माचे क्षेत्र आहे.

अध्यात्मातच माणसाचे विचार, भावना, आशा व आकांक्षा यांना योग्य दिशा दाखविण्याचे सामर्थ्य आहे. राजकीय, सामाजिक व आर्थिक क्रांत्या एकांगी असून त्यांत समाजाच्या एखाद्या समस्येचे निराकरण करण्याइतकेच मर्यादित सामर्थ्य असते व तसे केल्यानंतर त्या अन्य समस्यांना जन्म देतात. अशा तऱ्हेने समस्यांची शृंखला काही संपत नाही. समस्यांचे केवळ स्वरूपमात्र बदलते. अशा परिस्थितीत हा विचार करण्याजोगा विषय आहे की, मानवसमाजाची खरी सेवा करू शकणाऱ्या अध्यात्माचे सत्य स्वरूप ते कोणते आहे?

## समाजसेवी अध्यात्म

'समाज' या शब्दाचा वापर कार्यप्रवण जगासाठी करण्यात येतो. समस्या ह्यासुद्धा कार्यप्रवण जगाच्याच असतात. म्हणून कर्माला प्राधान्य देणारे आध्यात्मिक ज्ञानच समाजाच्या उपयोगी पडू शकते. त्या ज्ञानाचे स्वरूप असे असावयास हवे की, ज्यायोगे माणूस आपल्या विचारांना व भावनांना योग्य ते वळण लावून कोणत्याही प्रकारचे दडपण, भय, प्रतिबंध किंवा क्षणिक प्रलोभन यांना बळी न पडता स्वेच्छेने अशा प्रकारे विचार करावयास, बोलावयास व कर्म करावयास लागेल की त्याच्या स्वतःच्या हिताबरोबरच समाजाचेही हित होईल. दुसऱ्याशब्दांत सांगावयाचे म्हणजे 'वैयक्तिक हित' आणि 'सामाजिक हित' यांत अशी एकरूपता निर्माण व्हावयास हवी की उभयतांमध्ये कोणता भेदच राहू नये. वास्तविक हा भेद विसंगत आहे आणि वैयक्तिक हिताबद्दलचे अज्ञानच याच्या मुळाशी आहे. हे अज्ञान दूर करणे हे आध्यात्मिक ज्ञानाचे व पुरुषार्थाचे उद्दिष्ट असावयास हवे. व्यक्ती ही समाजाचे एक अंग आहे. ज्याप्रमाणे सर्व शरीरच जर सुदृढ नसेल तर शरीराच्या कोणत्याही अवयवाला स्वास्थ्य मिळू शकत नाही, त्याचप्रमाणे साऱ्या समाजाला सुदृढ केल्याशिवाय वैयक्तिक हित संभवत नाही. 'वसुधैव कुटुम्बकम्' हा सिद्धांतही याच तत्त्वावर आधारलेला आहे. जगाच्या विद्यमान सर्व समस्यांच्या मुळाशी याच एका गोष्टीबद्दलचे अज्ञान प्रामुख्याने दिसून येते. ही फार गंभीर चूक आहे.

ही चूक जितकी भौतिकवादी करीत आहेत तितकीच व्यक्तिवादी अध्यात्मही करीत आहे. तरीही भौतिकवाद्याला या चुकीची वेळोवेळी जाणीव होत

राहिल्याने तो आर्थिक, राजकीय व सामाजिक क्रांत्यांद्वारे समाजव्यवस्थेच्या चौकटीत बदल घडवून आणून समाजाची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करीतच आला आहे. थोडेफार तात्पुरते यश जरी त्याला प्राप्त झाले असले तरी स्थायी स्वरूपाची सुधारणा तो करू शकलेला नाही. व्यक्तिवादी अध्यात्म हे कार्य यशस्वीरित्या करण्यास समर्थ असले तरी त्या दिशेने त्याचे प्रयत्न म्हणण्यासारखे झालेले नाहीत. व्यक्तीच्या वृत्तींत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ्य अध्यात्मातच आहे. दुष्ट प्रवृत्तीच समस्यांना जन्म देतात आणि त्यांत परिवर्तन घडवूनच समस्यांचे बीज नष्ट करता येते. या परिवर्तनासाठी किंवा माणसावर मानसशास्त्रीय इलाज करण्यासाठी त्याला देह-स्मृती (Body-consciousness) ऐवजी आत्म-स्मृती (Soul-consciousness) धारण करावयास हवी. मी देह नसून देह धारण करणारा आत्मा आहे हे त्याने समजावयास हवे. या स्मृतिपरिवर्तनाने तो मनोविकारांपासून मुक्त होईल. ही मुक्तीच सर्व समस्या सोडवू शकेल आणि आणि मग जीवनात राहूनही अवस्था 'जीवन्मुक्त' राहील.

मानवी प्रवृत्तींच्या शुद्धीकरणासाठी करावयाच्या पुरुषार्थात अंधश्रद्धा व कर्मकाण्ड यांना कोणतेही स्थान असणार नाही, तसेच संसार सोडून कर्मसंन्यासी बनण्याची आज्ञाही असणार नाही. हे अध्यात्म 'पवित्र प्रवृत्तिमार्गाचे' प्रतिपादन करील आणि विशुद्ध ज्ञानच त्याचा पाया असेल. हे ज्ञान तर्क, अनुभव आणि विवेक यांच्या कसोटीला उतरेल. धर्म विश्वासपात्र गोष्ट (Religion is a matter of faith) न म्हणविता श्रेष्ठ जीवन-दर्शनाच्या (Philosophy of Life) रूपाने ज्ञानाचा विषय (Branch of Knowledge) समजला जाईल. आत्मा व परमात्मा यांचा सत्य परिचय, सृष्टिचक्राचे ज्ञान, आत्मा व परमात्मा यांच्या संबंधाचे स्वरूप व त्याची आवश्यकता, साकार सृष्टीतील साकार व्यक्ती व वस्तू तसेच स्वतःचे शरीर आणि शारीरिक संबंधी (आप्तमित्र इत्यादी) यांविषयी मनुष्यात्म्यांचा वास्तविक दृष्टिकोन कोणता असावा ?— तेच आध्यात्मिक ज्ञानाचे विषय होत. आत्मा आणि परमात्मा यांच्या स्नेहमय संबंधालाच 'योग' या शब्दाने संबोधले पाहिजे. माणसाने आपल्या मूळ गुणांत (प्रेम, आनंद, शांती) पुन्हा

संपूर्णपणे स्थिर व्हावे हा योगाचा एकमात्र उद्देश आहे. माणसाने आपली जन्मोजन्मींची पापे अर्थात विकारी संस्कार या ईश्वरी स्नेहमय संबंधाच्या अग्नीत किंवा योगाग्नीत भस्म करून व संपूर्ण पवित्र बनून मर्यादा-पुरुषोत्तमाच्या रूपाने या सृष्टीवर निवास करावा आणि समाजात व्यवहार करावा अशा प्रकारचे अध्यात्मच समाजाची खरी सेवा करू शकते आणि जगाला या समाजसेवी अध्यात्माचीच नितांत आवश्यकता आहे, परंतु हे व्यापक रूपात आणण्यासाठी आता एका अशा आध्यात्मिक क्रांतीची आवश्यकता आहे की ज्या धार्मिक समजुती व रूढपरंपरा यांना एक नवी दिशा देऊन व्यक्ती व समाज यांना सुंदर, सुदृढ व सुखशांतिसंपन्न बनवील.

## आध्यात्मिक क्रांती

आध्यात्मिक क्रांतीची आज जितकी अधिक आवश्यकता आहे तितकेच सध्याचे युग या क्रांतीच्या यशस्वी संचालनासाठी अनुकूल आहे. या वैज्ञानिक युगाचा माणूस प्रकृतीची (Matter) गुह्यतम रहस्ये तर्क व अनुभव यांच्या आधारे समजून घेण्याचा अभ्यासू बनला आहे. त्याला नवीन विचारप्रणाली आत्मसात करण्याची जिज्ञासा आहे. रूढीवादी विचार, अंधश्रद्धा, जुनाट परंपरा व तर्कविसंगत समजुती यांचा त्याला उबग आला आहे. धर्मावर आधारलेली मानवसमाजाची विभागणी त्याला बोचू लागली आहे. म्हणून त्यात क्रांतिकारी परिवर्तन घडून यावे असे त्याला वाटते. अध्यात्माच्या श्रेष्ठपणावर अजूनही त्याची श्रद्धा आहे. भीषण समस्यांच्या भोवऱ्यात सापडलेल्या आजच्या जगात अध्यात्मच त्याचे अंतिम आश्रयस्थान आहे. याच कारणामुळे विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या प्रगति-शिखरावर जाऊन पोहोचलेले पाश्चात्य देश भारताच्या प्राचीन आध्यात्मिक वैभवाकडे परम आदराने पाहत आहेत, परंतु खरे ईश्वरदत्त ज्ञान व सहज राजयोग हे आज काळाच्या उदरात जवळजवळ गडप झाले आहेत, विस्मृतीच्या पडद्याआड गेले आहेत. त्यांना पुन्हा वर आणावयास हवे. त्यांना पुनर्जीवित केले पाहिजे. त्यांचा ओघ माणसाच्या मनात पुन्हा प्रवाहित करावयास हवा. सागर राजाच्या मृतवत झालेल्या पुत्रांना ज्ञानगंगेच्या ज्ञानधारांनी चैतन्यत्व

प्रदान केले पाहिजे. अज्ञाननिद्रेत गाढ झोपी गेलेल्या कोट्यवधी कुंभकर्णांना जागृत करावयास हवे.

सांप्रत आध्यात्मिक क्रांती यशस्वी होण्यात ज्याप्रमाणे लोकांची गरज व गरजेपोटी निर्माण झालेली आकांक्षा सहाय्यक ठरणारी आहे त्याचप्रमाणे तिची गुह्यतम रहस्ये जाणून घेण्यासाठी वैज्ञानिक ज्ञानही सहाय्यक होणार आहे. आध्यात्मिक ज्ञानाच्या तात्त्विक विश्लेषण-क्रमात जे एक रहस्य प्रकट व्हावयाचे आहे ते हेच आहे की, भौतिक ज्ञानाची तत्त्वे व आध्यात्मिक ज्ञानाची तत्त्वे यांचे अंतिम स्वरूप एकच आहे. आजचा अणुशास्त्रज्ञ सूक्ष्म विश्वाची रहस्ये उकलण्याचा प्रयत्न करीत आहे, मूलभूत कणांच्या (Fundamental Particles)क्रिया व प्रक्रिया यांचे निरीक्षण करण्यात मग्न झाला आहे. त्यामुळे सूक्ष्मातिसूक्ष्म तत्त्वे जाणण्याची आणि पारखण्याची क्षमता त्याच्यात येत चालली आहे. तिच्या आधारे त्याला हे जाणणे फार अवघड वाटता कामा नये की, माणसाच्या अंतरंगात विचार व भावना यांचे शोषण (Absorption)व उत्सर्जन (Radiation)करणारा एक अति सूक्ष्म 'कण' आहे ज्याला 'आत्मा' असे म्हणतात. हा आत्म-कण माणसाचा मेंदू (Brain)नव्हे तर त्याहून वेगळा आहे हे येथे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. मेंदू हा केवळ स्मृतीचे (Memory)कार्य करीत असतो. विवेक आणि भावना (Discretion and Emotion)यांचे गुण मेंदूत नसून आत्म्यात असतात. आजच्या विज्ञानाला ही गोष्ट जाणणे व पटणे फारसे जड जाणार नाही की, परमात्मा हासुद्धा या गुणांनी युक्त पण अधिक शक्तिशाली असा कणच आहे. आत्मा आणि परमात्मा यांमधील 'योग' प्रक्रियेत विचारांचेच संचालन होत असते. त्यामुळे माणसाच्या विचारप्रणालीला नवी दिशा मिळते. भौतिकविज्ञान विचार-तरंगांचा मुक्त प्रवाह जाणण्यात व ते नियंत्रित करण्यात जसजसे यशस्वी होत जाईल तसतसे ते अध्यात्माच्या निकट येत जाईल. विज्ञानाने आज त्या सर्व परिस्थिती प्रस्तुत केलेल्या आहेत. त्यामुळे आध्यात्मिक तत्त्वांचे विवेकपूर्ण विश्लेषण करणे शक्य झालेले आहे. व्यापक संचार व्यवस्था (mass media of communications)इतकी कार्यक्षम व तीव्र आहे की,

कोणतीही नवीन विचारप्रणाली जगाच्या कानाकोपऱ्यातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत जाऊन पोहोचण्यास क्षणाचाही विलंब लागत नाही. अशा परिस्थितीत क्रांतीची एक लाट उसळण्याची आवश्यकता आहे. वास्तविक ती लाट उसळलेली आहे. त्या लाटेने विश्वाचे परिवर्तन घडवून आणण्याचा विडा उचललेलाही आहे. फक्त तिचे स्वरूप आता व्यापक व्हावयाचे तेवढे राहिले आहे. ही क्रांती यशस्वी झाल्यानंतर हे जग सर्व समस्यांपासून मुक्त होईल. दुःख, अशांती व टंचाई नाममात्रही राहणार नाही. कलह, क्लेश, वैमनस्य यांविषयी ते जग संपूर्णपणे अनभिज्ञच असेल. अखिल विश्वात एक भाषा, एक धर्म व एक राज्य असेल. अध्यात्माचे हे स्वरूप समाजाची एकदाच अशी सेवा करते की, त्यानंतर दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या सेवेची आवश्यकता भासत नाही. या संदर्भात सुप्रसिद्ध फ्रेंच लेखक व भविष्यवक्ता ज्यूल व्हर्न याची ही भविष्यवाणी उद्‌धृत करणे योग्य ठरेल की, इ. स. २,००० पर्यंत एक अशी धार्मिक क्रांती घडून येईल की जी ईश्वर व आत्मा यांविषयी नवी नवी रहस्ये प्रकट करील व विज्ञान त्यांना पुष्टी देईल. त्याचे पर्यवसान लोकांत आस्तिकता, न्याय, नीती, शिस्त व कर्तव्यपरायणता इत्यादी गुण विकसित करण्यात होईल.

# जग उन्नतीच्या दिशेने जात आहे की अवनतीच्या दिशेने?

**वि**ज्ञानाने लावलेल्या शोधांमुळे आज जगात दिवसेंदिवस फार झपाट्याने स्थित्यंतरे घडून येत आहेत. नित्य नवी नवी सुखसोयीची साधने वा वस्तूंचे उत्पादन केले जात आहे. विज्ञानाने दैनंदिन जीवनाला उपयोगी पडतील अशा पुष्कळ वस्तू माणसाला उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे माणसाचे खाणेपिणे, राहणीमान वगैरेंत अतोनात बदल घडून आला आहे आणि घरे, गल्ल्या, गावे व शहरे यांचा कायापालट झाला आहे. आज नळ सोडताच पाणी माणसाच्या सेवेस उपस्थित होते, बटन दाबताच वीज प्रकाश देऊ लागते, पंखा वारा घालू लागतो, अग्नी प्रकट होतो व कारखान्याची मोठमोठाली यंत्र चालविली जातात. वाहतुकीसाठी बैलगाड्यांऐवजी आज वेगवान मोटारी, बसगाड्या, जहाजे व विमाने यांचा उपयोग केला जात आहे. एवढेच नव्हे तर अंतरिक्षयाने व अग्निबाण यांद्वारे माणूस चंद्रावर उतरण्यातही यशस्वी झाला आहे. ही व अशी अन्य साधने पाहून आज बहुतेकांना वाटते की जगाची प्रगती होत असून ते उन्नतीच्या शिखरावर जात आहे. परंतु वस्तुतः हे खरे आहे का?

### जगाच्या सध्याच्या परिस्थितीवर गंभीर विचार

**गंभीरतेने विचार केल्यास असे आढळून येईल की, एकीकडे विज्ञानाने माणसाला यंत्रे उपलब्ध करून देऊन त्याची उत्पादनक्षमता वाढविली आहे व कार्य सुलभ केले आहे. परंतु दुसरीकडे माणसाचे अंतःकरण मात्र यंत्रासारखे कठोर बनविले आहे. दया, सहृदयता, करूणा या भावना माणसाच्या मनातून लुप्तप्राय झाल्या आहेत. जरी विज्ञानाने आज माणसाला शेतीसाठी ट्रॅक्टरसारखी यंत्रे उपलब्ध करून दिलेली असली तरी संपन्न देशांतील निर्दयता व स्वार्थपरायणता इतक्या थराला जाऊन पोहोचली आहेत की, आज जगातील अर्ध्याहून अधिक लोकांना दोन वेळा पोटभर जेवावयाची मारामार आहे आणि भांडवलदार लोकमात्र कोट्यवधी रूपये कमावूनही आपल्या कारखान्यांत घाम**

**गाळणाऱ्या कामगारांची हलाखीची परिस्थिती पाहून त्यांच्यावर दया करताना दिसत नाहीत. आज विज्ञानामुळे माणसाला तीव्र वेगाच्या मोटारी, आगगाड्या, विमाने इत्यादी साधने उपलब्ध झालेली असली तरी त्यांचे जीवनमात्र अत्यंत व्यस्त व चिंताग्रस्त झालेले असून त्याच्या जीवनाविषयक समस्या बऱ्याच वाढल्या आहेत. काही ठिकाणी पाणी अडवून माणसाने वीजही निर्माण केली आहे तर काही ठिकाणी डोंगर खोदून रस्तेही बांधले आहेत. परंतु हे सर्व करून त्याने समतोलपणा बिघडवून टाकला आहे आणि गिरण्या-कारखान्यांच्या गडगडाटात तंटेबखेडे वाढवून आपली झोप उडवून टाकली आहे व जगात कृत्रिमपणाच वाढविला आहे.**

आज विज्ञानाने माणसाला अशी अनेक यंत्रे उपलब्ध करून दिली आहेत की ज्यांच्या साहाय्याने तो भाज्या व फळे कित्येक दिवस ताजी ठेवू शकतो, सुलभतेने आग पेटवू शकतो, थंडीत खोली उबदार ठेवू शकतो व उन्हाळ्यात ती थंड करू शकतो, बटन दाबताच दूरदूरच्या बातम्या ऐकू शकतो, परंतु हे सर्व काही उपलब्ध असूनही तो तृप्त झालेला नाही, उलट त्याची वासना व विलासीपणामात्र बळावला आहे. या भोग-सामग्रीने तो अधिकच भोगी बनला आहे. त्याचे मन आपल्या मूळ स्वरूपापासून व परमपिता परमात्म्यापासून दूरच होत चालले आहे व ते कधीही तृप्त न होणाऱ्या इच्छांमागे पिसाटासारखे भरकटत आहे.

आज माणसाने मोटारगाडी, टेलिफोन, रेफ्रिजरेटर, ट्रान्झिस्टर, टेलिव्हिजन इत्यादींना उच्चभ्रूतेची लक्षणे मानली आहेत व ती प्राप्त करण्यासाठी तो आत्म्याच्या आवाजाकडे लक्ष न देता लाचलुचपत, भेसळ, अप्रामाणिकपणा इत्यादी वाममार्गांचा अवलंब करून इतरांना लुबाडीत आहे. त्यामुळे सर्वत्र अधर्म, दुराचार, भ्रष्टाचार, व्यभिचार इत्यादींना ऊत आला आहे. परिणामतः माणूस खऱ्या सुखाला पारखा झाला आहे. तो साधनांचा दास बनलेला असून आपले स्वातंत्र्य, चारित्र्यरूपी अमूल्य संपत्ती व योगानंदासारखा अतुलनीय खजिना गमावून बसला आहे आणि दारुड्याप्रमाणे क्षणभंगुर सुखाच्या मस्तीत गटारात लोळत पडला आहे.

**विज्ञानाने माणसाला बुद्धीचा विकास करण्यास भरपूर वाव दिलेला**

**असला तरी बुद्धीची दिव्यतामात्र छिनावून घेतली आहे. त्याने माणसाला वीज व अणुशक्ती उपलब्ध करून दिली आहेत खरी परंतु आत्मिक शक्ती काढून घेतली आहे. त्याने साधने प्राप्त करून दिली आहेत पण आध्यात्मिक साधना संपुष्टात आणली आहे. त्याने कर्मात यांत्रिक कौशल्य आणलेले असले तरी धार्मिक कौशल्यमात्र नष्टप्राय केले आहे. त्याने अंधश्रद्धेचा नायनाट केला आहे पण माणसाला दारूगोळा देऊन दहशत व अत्याचारमात्र वाढविला आहे, अविश्वास निर्माण करून भय वाढविले आहे. त्याने जीवनाच्या समस्यांकडे माणसाचे लक्ष अवश्य वेधून घेतले आहे पण पवित्र आचरण व परमात्म्याचे स्मरण हे जे त्या समस्यांचे निवारण करणारे वास्तविक व एकमात्र साधन आहे त्यापासून मात्र त्याचे लक्ष हटविले आहे. तेव्हा, विचार पडतो की, विज्ञानामुळे माणसाचा फायदा झाला आहे की नुकसान, तो उन्नत्तीच्या शिखरावर चढला आहे की अवनतीच्या गर्तेत खोलवर घसरला आहे?**

## जगाच्या विद्यमान दशेची रावणराज्याशी तुलना

सामान्यतः असे मानले जाते की, रावणाच्या राज्यात सर्व सुखसोयी उपलब्ध होत्या. त्याची लंका नगरी सोन्याची होती. सर्व प्रकारच्या विद्या पूर्णपणे विकास पावल्या होत्या. विमाने सर्रासपणे प्रचलित होती. विविध प्रकारच्या बाणांचा युद्धांत उपयोग केला जात असे. वरुण, वायू, अग्नी वगैरे देव रावणाच्या आधिपत्याखाली होते. वरुण पाणी भरत असे, वायू पंख्याने वारा घालीत असे आणि अग्नी अन्न शिजवित असे. सर्व कामे सहजगत्या होत होती. कोणतीही अडचण जाणवत नव्हती. असे म्हणतात की, रावणाच्या राज्यात माणसाने सर्व काही आपल्या ताब्यात ठेवले होते, परंतु फक्त दोन शक्ती त्याला प्राप्त नव्हत्या. एक लोखंडाचे सोने बनविण्याची शक्ती व दुसरी चंद्रावर लोक चढून जाऊ शकतील इतकी लांब शिडी बनविण्याची शक्ती. बाकी सर्व काही त्याच्या राज्यात होते. त्या सर्व भोग-सामग्रीसमवेत 'काम' तर होताच पण क्रोध, आळस, स्वैराचार, दुराग्रह व नास्तिकपणाही होता. त्याचा परिणाम काय झाला हे सर्वांना विदितच आहे! त्या भौतिक उन्नतीचे पर्यवसान कशात झाले? सर्व

सुख-सामग्रीसंपन्न असूनही लोकांना 'असूर' ही संज्ञा प्राप्त झाली, ते राज्य 'रावणराज्य' (दुःखदायक राज्य) म्हणून कुप्रसिद्ध झाले व शेवटी त्या सुधारणेचा, संस्कृतीचा वा समाजाचा विध्वंस व विनाशच झाला. नेमकी तीच दशा आजच्या समाजाची वा सुधारणेची झालेली दिसत आहे.

आज माणसाजवळ सर्वकाही आहे. त्याने वायू, अग्नी, वरुण (पाणी) इत्यादींना एका प्रकारे वशच करून घेतले आहे आणि अमेरिका वगैरे देशांत सोन्याचीही काही कमतरता नाही. उणीव राहिली आहे ती हीच की, अद्याप जनसामान्याला 'चंद्रावर चढून जाता येईल अशी शिडी' माणूस बनवू शकलेला नाही. त्यासाठी त्याचे शिकस्तीचे प्रयत्न चालूच आहेत. आजही जगात सर्व काही आहे परंतु चारित्र्य, दिव्य बुद्धी किंवा धर्म मात्र नाही. माणूस ईश्वरापासून विमुख किंवा विपरीत बुद्धीचा झालेला आहे. म्हणून आजच्या जगाला 'रावणी संसार' म्हटल्यास ती अतिशयोक्ती होणार नसून यथार्थ वर्णन व सत्य विवेचनच ठरेल. अशा जगाची गती काय होईल, त्याचे पुढे काय होईल याचा निर्णय या तुलनेद्वारे आता सहजच लावता येईल. ते उन्नतीच्या शिखरावर आहे की अवनतीच्या गर्तेत पडलेले आहे हे आता दिसून येत आहे. आज या जगात सर्वकाही उपलब्ध असूनही जणू काहीही नाही. कारण त्यात चारित्र्याचा व ईश्वरनिष्ठेचा अभाव आहे. त्यामुळे विपरीत-बुद्धीच्या समाजाचा विनाश होणे अटळ आहे.

### चारित्र्याविना सर्व सुखे व्यर्थ व काक-विष्ठे समान होत

कित्येक लोक म्हणतात की, चारित्र्य नसले म्हणून काय झाले, बाकी सर्वकाही तर आहे ना! अशा प्रकारे चारित्र्याला 'एक चीज' मानून ते त्याची किंमत कमी करतात. परंतु चारित्र्य हे किती महत्त्वाचे आहे, जीवनाचा पाया आहे याकडे कोणाचे जावे तसे ध्यान जात नाही. यावर मला एक इंग्रज लेखकाची 'एका खिळ्याअभावी' (For the want of a nail)ही सुप्रसिद्ध गोष्ट आठवते. घोड्याच्या नाल्यामधून एक खिळा निखळून पडल्याने तो घोडा कुचकामी ठरला. या घोड्यावर स्वार झालेला शिपायीही त्यामुळे कुचकामी ठरला. त्या शिपायाला त्या अवस्थेत महत्त्वाची कामगिरी बजावता न आल्यामुळे त्याच्या देशाला लढाईत

पराभव पत्करावा लागून आपले स्वातंत्र्य गमवावे लागले. एका क्षुल्लक खिळ्याअभावी हे भयंकर नुकसान झाले. अशा रीतीने आज एका चारित्र्याच्या किंवा सत्य धर्माच्या अथवा ईश्वरनिष्ठेच्या अभावी विज्ञानाने उपलब्ध करून दिलेली सर्व साधने व्यर्थ असून ही सर्व सुखे दिखाऊ व फोल आहेत. ती विद्यमान असूनही माणूस आज चिंताग्रस्त व दुःखी आहे. त्याच्या आत्म्याला खरी शांती नाही.

याच्या तुलनेत सत्ययुगात अपार सुख होते कारण त्या काळी माणसापाशी केवळ गडगंज संपत्ती होती असे नव्हे तर चारित्र्यरूपी धनही होते. तसेच, विज्ञानाद्वारे प्राप्त झालेली सर्व सुखसोयीची साधनेही त्या काळी उपलब्ध होती. परंतु माणसाची बुद्धी दिव्य असल्यामुळे ती साधने तो केवळ विधायक व अहिंसक कार्यासाठीच उपयोगात आणीत असे. त्या काळी माणूस वस्तू व साधने यांचा दास झालेला नव्हता उलट त्याच त्याच्या दासी बनल्या होत्या. तेथील प्रजा चांगल्या स्वभावाची असल्याने तिचा प्रभावही प्रकृतीवर चांगलाच पडलेला होता. त्यामुळे श्रेष्ठ सुखे प्रजेला उपलब्ध होती. विमान त्या काळातही प्रचलित होते परंतु लोक बेईमान झाले नव्हते. वीजही तेथे होती परंतु माणसाच्या बुद्धीत ते बीज रुजलेले नव्हते, ज्यामुळे उत्तेजित होऊन माणूस विध्वंस व विनाश करण्यास प्रवृत्त होतो अर्थात त्याच्यात क्रोध, आवेश, द्वेष, मत्सर इत्यादी दुर्गुण मुळीच नव्हते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ते दिवस परम भाग्याचे होते व ते सुख खरे होते.

जगाचा हा वास्तविक इतिहास किंवा जगाची ही उन्नती व अवनतीची अद्भुत कहाणी जाणून घेऊन त्यापासून आपणास एक अविस्मरणीय धडा घ्यावयास हवा. आता जेव्हा कलियुग संपुष्टात येत आहे व सत्ययुगाचे आगमन होत आहे तेव्हा **विज्ञानाला सुखदायक बनविण्यासाठी आपण ईश्वरी ज्ञान समजून घेणे आवश्यक आहे.** आता आपणास गमावलेली पवित्रता पुन्हा प्राप्त करण्याचा संपूर्ण पुरुषार्थ करावयास हवा. चारित्र्याच्या ऱ्हासामुळे ज्या जगाला आपण विज्ञानाचा उपयोग करून नरकतुल्य बनविले आहे त्याच जगाला आपण आता चारित्र्याच्या बळावर स्वर्ग बनविण्याच्या कार्याला आपण जुंपून घ्यावयास हवे.

आता आपणास परमपिता परमात्म्याशी प्रीत बुद्धी होऊन रामराज्य स्थापन केले पाहिजे. अन्यथा निकट भविष्यात या रावणराज्याच्या घडून येणाऱ्या विनाशापूर्वी योगबळाने जर आपण आपल्या पापांचा विनाश केला नाही तर केवळ निराशाच आपल्या पदरात पडेल.



# माणूस चंद्रावर कसा पोहोचला?
# चंद्राविषयी विचित्र समजुती

**का**ही वर्षापूर्वी चंद्रारोहण करणे हे माणसाच्या आवाक्याबाहेरचे समजले जात होते. परंतु २० जुलै १९६९ या दिवशी अमेरिकेचे अंतराळवीर नील आर्मस्ट्राँग व एल्ड्रिन यांनी चंद्रभूमीवर पदार्पण केले आणि त्यांनी पृथ्वीवर परतताना आपल्या बरोबर चंद्रावरील माती व खडक यांचे काही नमुनेही आणले. माणसाने चंद्रावर उतरणे, तेथून प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेल्या गोष्टींची माहिती पुरवणे व सोबत छायाचित्रे आणणे यामुळे पुराणांत व शास्त्रांत वर्णन केलेल्या बऱ्याच गोष्टी आज केवळ भ्रामकच नव्हेत तर हास्यास्पद वाटू लागल्या आहेत. तसेच माणूस चंद्रावर पोहोचल्यामुळे मानवमात्राच्या पुरुषार्थासाठी उपयुक्त ठरतील असे काही निष्कर्षही काढता येण्याजोगे आहेत. आम्ही या दोन्ही गोष्टींचा येथे आळीपाळीने उल्लेख करणार आहोत.

### चंद्रलोक आहे का? चंद्र ही कोणी देवता आहे का?

पुराणांत चंद्राविषयी अनेक कथा दिलेल्या आहेत. त्यांत लिहिले आहे की, जेव्हा देव व असूर यांनी एकत्र येऊन **समुद्रमंथन** केले तेव्हा त्यातून अमृतकुंभ, ऐरावत हत्ती, कल्पवृक्ष इत्यादींसमवेत **चंद्रही बाहेर पडला.** त्यात पुढे लिहिले आहे की, अमृत प्राशन करण्यासाठी जेव्हा सूर्य व चंद्र या देवता एकत्र बसल्या होत्या तेव्हा राहूही एका देवतेचे रूप धारण करून त्या उभयतांमध्ये जाऊन बसला. परंतु राहूचा हा डाव सूर्य व चंद्र यांनी उघडकीस आणला. यामुळे उभयतांचा राहू हाडवैरी बनला व ग्रहणाद्वारे तो त्यांच्यावर सूड उगवित असतो. या राहूमुळेच चंद्राच्या कला कमी होत जातात. पाहा तर खरे, आजच्या युगात ही कथा किती आश्चर्यकारक वाटते ती! सूर्य व चंद्र यांना **देवता मानून** अमृत प्राशनासाठी ते एकत्र बसले होते असे सांगणे ही किती विवेकशून्य व विज्ञानविरोधी गोष्ट आहे! श्रीमद्‌भागवताला वैष्णव लोक 'पंचम वेद' मानतात. यातही अशा विचित्र कथांचा भरणा असणे हे किती विस्मयकारक आहे! कोण

बरे हे सांगू शकेल की **ज्या समुद्रापासून चंद्र निघाला तो समुद्र कोठे आहे** आणि चंद्र पृथ्वी पासून ४००००० किलोमीटर दूर आपल्या कक्षेत कसा जाऊन पोहोचला ?

तसेच हे जे लिहिले आहे की, चंद्र ही एक देवता आहे व त्याने दक्षप्रजापतीच्या २७ कन्यांशी विवाह केला. त्यामुळे चिडून जाऊन दक्षप्रजापतीने त्याला शाप दिला. या शापाचा परिणाम म्हणून चंद्राची प्रत्येक दिवशी एक कला कमी होत असते. ही हास्यास्पद गोष्ट नव्हे तर काय ? आता जे अंतराळवीर चंद्रावर गेले होते त्यांना काही तेथे दक्षप्रजापतीच्या रोहिणी इत्यादी २७ कन्या आढळल्या नाहीत.

आपल्याला आश्चर्य वाटेल, श्रीमद्‌भागवत इत्यादी ग्रंथांत तर असेही लिहिले आहे की, चंद्राच्या खाली आणि पृथ्वीच्या वर यांमध्ये जो **'अंतरिक्ष लोक'** आहे, त्यात यक्ष, राक्षस व पिशाच्चे राहतात (श्रीमद्‌भागवत स्कंध ५, अध्याय ३) व त्याच्याही वर पण चंद्राच्या जरा खाली सिद्ध, विद्याधर, चारण वगैरे निवास करतात (श्रीमद्‌भागवत स्कंध ५, अध्याय २२). परंतु अंतराळ वीरांनी चंद्राकडे जाताना वाटेत यांपैकी एकालाही पाहिले नाही. तसे पाहिले तर एका अर्थाने आर्मस्ट्रॉंग व एल्ड्रिन यांनाच **'सिद्ध' व 'चारण'** म्हणता येईल. कारण सिद्धी प्राप्त करून ते तेथे भ्रमण करीत राहिले. तेव्हा पाहा, शास्त्रकारांनी **'अंतरिक्ष लोक'** इत्यादी अनेक कपोलकल्पित 'लोक' वर्णन करून त्यांत राक्षस, यक्ष सिद्ध वगैरे राहतात असे ठोकून दिले आहे.

प्रत्यक्ष चंद्रालाही श्रीमद्‌भागवत इत्यादी ग्रंथांत व वेदशास्त्रांत एक 'लोक' म्हटले गेले आहे. परंतु आज हे सिद्ध झाले आहे की, चंद्रावर लोकवस्ती नसून तो एक **निर्जन ग्रह** आहे. चीनमध्ये एक प्राचीन दंतकथा प्रचलित होती की, एक चीनी महिला चार हजार वर्षांपूर्वी चंद्रावर गेली होती आणि आजही ती तेथे असून तिच्याबरोबर एक खारही आहे व दोन्ही चंद्रावर दिसतात. आर्मस्ट्रॉंग व एल्ड्रिन यांना अमेरिकेतील चंद्रयानाच्या भूस्थित नियंत्रणालयामधून (Ground-Control) संचालकांनी संदेश पाठविला की, "अरे, त्या चीनी

स्त्रीचा कोठे ठावठिकाणा लागतो का पाहा बरं का," आर्मस्ट्राँगने हसत हसत म्हटले की, "हो हो, जरूर शोध करू पण ती तेथे कोठे दिसतच नाही." या सर्व वृत्तांतावरून चंद्र हा कोणी लोक नाही हे सिद्ध होत नाही काय? तेव्हा, वेदशास्त्रांची चंद्र हा एक लोक आहे ही जी मान्यता आहे ती भ्रामक नाही का? शिवाय शास्त्रकारांचा असा दावा आहे की, शास्त्रांतील ज्ञान हे त्रिलोकीनाथ परमात्म्याने दिले आहे आणि आता चंद्र इत्यादींचा उल्लेख तर प्रयोगांनी चुकीचा सिद्ध झालेला आहे ;मग अशा शास्त्रांतील 'ज्ञान' ईश्वरदत्त मानणे कितपत योग्य ठरेल?

शास्त्रांत **'चंद्र सालोक्य' याला** म्हणजे एखाद्या आत्म्याने चंद्रावर जाण्याला **'स्वर्ग-प्राप्ती'** मानले गेले आहे. याचा अर्थ चंद्रालाही स्वर्ग लोकातच असल्याचे मानले गेले आहे असाच होतो. म्हणजे, आर्मस्ट्राँग व एल्ड्रिन जेव्हा २० जुलै १९६९ ला चंद्रावर जाऊन पोहचले अर्थात 'चंद्र सलोक्य' याला प्राप्त झाले, तेव्हा ते 'स्वर्गवासी' झाले असे म्हणता येईल का? पूर्वी आपण भारतवासी एखादी व्यक्ती मृत्यू पावली की ती 'स्वर्गवासी' झाली असे म्हणत असू, परंतु आता तर जिवंत व सूट-बूट घातलेले लोक येथून अन्न वगैरे घेऊन स्वर्गवासी होतात असेच म्हणावे लागेल.

पुराणे व शास्त्रे यांत शंकराच्या जटा चंद्राने सुशोभित केलेल्या दाखविल्या आहेत. म्हणूनच शंकराचे चंद्रमौलीश्वर, चंद्रशेखर, चंद्रचुडामणी इत्यादी नावांनी स्तवन केले जाते. तेव्हा, प्रश्न उद्‌भवतो की, शंकराच्या जटा अलंकृत करणारा हा चंद्र कोणता आणि आर्मस्ट्राँग व एल्ड्रिन हे याच चंद्रावर उतरले होते का? सारे अजबच म्हणावयाचे!

आणखी एक गमतीची गोष्ट पाहा. श्रीमद्‌भागवतात लिहिलेले आहे की, सूर्याच्या किरणांपासून **एक लक्ष योजने दूर** अंतरावर चंद्र आहे (श्रीमद्‌भागवत स्कंध ५, अध्याय २२). जरा विचार करा की, किती निरर्थक आहे ही गोष्ट! कदाचित चंद्र आकाराने लहान असलेला पाहून किंवा त्याच्या प्रकाशाचा शीतलपणा अनुभवून चंद्र सुर्याच्याही पलीकडे आहे असे मानले गेले असावे.

शास्त्रे व पुराणे यांतील वरील सर्व उल्लेख किंवा भ्रामक समजुती यांवर विचार करून आपण निर्णय द्या की, ज्या ग्रंथांत असे अनिश्चित उल्लेख आहेत त्यांतील ज्ञानाचे स्त्रोत 'त्रिलोकीनाथ' परमात्मा आहे असे मानणे योग्य ठरेल का आणि त्यांत असलेले 'त्रैलोक्याचे' वर्णन हे खरे आहे की चुकीचे?

शेवटी या बाबतीत आमच्या 'ज्ञानामृत' मासिकाचे पूर्ववर्ती जे 'त्रिमूर्ति' नावाचे मासिक, त्याच्या एका अंकातील (वर्ष १९५७-५८, नोव्हेंबर-डिसेबर-जानेवारी अंक) संपादकीय लेखात दिलेला मजकूर आम्ही येथे उद्धृत करू इच्छितो. हा मजकूर सुमारे वीस वर्षांपूर्वी जेव्हा रशियाने आपला पहिला स्पुटनिक 'लायका'वर अंतराळात पाठविला होता तेव्हा प्रकाशित केला होता. वाचकांना तो उद्बोधक वाटेल अशी आशा आहे. तो मजकूर येणेप्रमाणे होता–

"...गुह्य ईश्वरी ज्ञानाच्या आधारे आम्ही जाणतो की, वैज्ञानिक शास्त्रज्ञ ज्या उद्देशाने चंद्र व इतर ग्रहांवर जाण्याचे प्रयत्न करीत आहेत ते सर्व निष्फळ ठरतील. कारण चंद्र हा जणू सृष्टीरूपी रंगमंचकाचा एक प्रकाशदीप आहे. **त्यात कोणताही लोक बसलेला नाही** आणि सृष्टीरूपी नाटकाची भावी (नियती) अशी बनलेली आहे की, शास्त्रज्ञांचे तेथे जाऊन पोहोचणे ही गोष्ट सृष्टीच्या संभाव्य महाविनाशाची नांदीच ठरेल..." (आपल्या लक्षात असू द्या की, त्यावेळेला रशियाने म्हटले होते की, लायकाला वर अंतराळात पाठविणे हे विश्व-शांतीच्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे, परंतु आपण जाणता की, आज चंद्रारोहण केल्यानंतरही विश्व-शांतीचे उद्दिष्ट काही पूर्ण झालेले नाही.) या मजकुरात चंद्रावर कोणताही लोक बसलेला नाही असे जे प्रतिपादन केले होते ते आज सिद्ध झालेले आहे आणि संभाव्य महाविनाशाची चिन्हेही स्पष्टपणे दिसू लागलेलीच आहेत. त्यासाठी अणू व हायड्रोजन बॉंब, क्षेपणास्त्रे इत्यादी विध्वंसक साधने निर्माण केली गेली आहेत हे सर्वांना विदितच आहे. या दोन गोष्टींची पूर्वघोषणा आम्ही परमपिता शिव परमात्म्याकडून लाभलेल्या दिव्य दृष्टीच्या आधारे केली होती. हे दिव्य दृष्टीचे वरदान ईश्वरी विद्यालयातील अनेक ब्रह्माकुमारी

भगिनींना प्राप्त झालेले आहे. त्या योगस्थित होऊन ध्यानावस्थेत जे बघतात त्याच्या आधारे आम्ही उपरोक्त मजकूर प्रकाशित केला होता. आम्ही पुन्हा एकदा सांगतो की, सूर्य व चंद्र हे सृष्टीचे दिवस-रात्र, ऋतुपरिवर्तन, प्रकृती व दृश्य-परिवर्तन इत्यादींची साधने असून त्यांत कोणताही लोक वसलेला नाही.

## चंद्र ग्रहाची पूजा

चंद्राच्या बाबतीत आणखी एक हास्यास्पद गोष्ट आहे. शतकानुशतके भारतातील लोक एखाद्या शुभकार्यास आरंभ करण्यापूर्वी ग्रहांच्या शांतीसाठी व त्यांच्या शुभदृष्टींसाठी त्यांची पूजा करीत आले आहेत. त्या पूज्य नवग्रहांमध्ये चंद्राचीही गणना होत आली आहे. परंतु आता तर आर्मस्ट्राँग व एल्ड्रिन यांनी बूट घातलेल्या पायांनी चंद्राला स्पर्श केला आहे. तेव्हा, चंद्राची पूजा चालू ठेवावी की नाही हा एक मोठा वादग्रस्त विषय बनलेला आहे. आर्मस्ट्राँग व एल्ड्रिन हे अभक्ष्य भक्षण करणारे, मद्यपान करणारे व काम-क्रोधादी विकारांच्या अधीन झालेले संसारी लोक आहेत. त्यांना शास्त्रीपंडित 'म्लेच्छ', 'असूर' किंवा 'अपवित्र' मानतील, असे लोक चंद्र 'देवता' किंवा चंद्र ग्रहावर बूट घालून उतरले आणि न जाणो कोणकोणत्या अशुद्ध धातूच्या वस्तू तेथे ठेवून आले (अमेरिका इत्यादी देशांचे ध्वजही तेथे रोवून आले) तेव्हा, आता चंद्राची पूजा करणे योग्य आहे का? पूजा ही सदैव पवित्र व निर्मळ व्यक्तींची किंवा वस्तूंची होत असते. परंतु आपल्याला आश्चर्य वाटेल की, अजूनही कित्येक पंडित चंद्राची पूजा तशीच चालू ठेवावी असा दुराग्रह धरतात (या बाबतीत नवभारत टाईम्सची २६ जुलै १९६९ ची दिल्ली आवृत्ती पाहावी). जरा गंभीरपणे विचार करा की अद्यापही लोक चंद्राची पूजा करणे सोडावयास तयार नाहीत, ते परमपिता परमात्म्यापासून किती विमूख झालेले आहेत व किती दुराग्रही बनलेले आहेत हे यावरून दिसून येते.

## माणूस चंद्रापर्यंत कसा पोहोचला?

आता आपण माणूस चंद्रापर्यंत कसा पोहोचला यावर थोडी चर्चा करू या. आपण म्हणाल की, विज्ञानाच्या बळावर माणूस चंद्रापर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाला ही तर सर्वमान्य गोष्ट आहे. हे उत्तर तर योग्य आहे परंतु आपण अधिक

खोलात जाऊन विचार केलात तर याच निष्कर्षाला येऊन पोहोचाल की, इतके विज्ञानबळ जे ज्यांना प्राप्त झाले ते सुद्धा दुसऱ्या एका आधारावर टिकाव धरून आहे. वैज्ञानिक शास्त्रज्ञ हे जे एकाहून एक आश्चर्यकारक शोध लावण्यात कल्पनातीत यशस्वी झाले याचे कारण ते एकाग्रतेने, उत्साहाने, धैर्याने व संघटित होऊन संशोधन-कार्यास लागले आणि अविश्रांतपणे व आशावादी राहून काम करीत राहिले. म्हणून ही गोष्ट आपण कदापीही विसरता कामा नये की, ही जी शक्तिशाली साधने निर्माण केली गेली आहेत त्यांचा मूलभूत आधारही माणसाचे काही सद्‌गुण आहेत, ज्यांना एकाग्रता, उत्साह, धैर्य, ऐक्य, आशावादीपणा, अविश्रांत परिश्रम इत्यादी नावे दिली जातात. शास्त्रज्ञांना इतके प्रचंड यश लाभण्याचे कारण म्हणजे वरील सद्‌गुणच होत. तसेच आर्मस्ट्रॉंग व एल्ड्रिन यशस्वी होण्याचे कारण त्यांच्या ठिकाणी असलेले साहस, निर्भयता, शौर्य, हिम्मत इत्यादी सद्‌गुणच आहेत. जर शास्त्रज्ञांत व अंतराळवीरांत हे गुण नसते तर आज जो त्यांनी पराक्रम करून दाखविला तो कधीही शक्य झाला नसता.

अंतराळवीरांच्या या गुणांच्या प्रभावामुळे अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष निक्सन यांनी, ते चंद्र-प्रवासास निघण्यापूर्वी त्यांच्या समवेत भोजन करण्याची इच्छा प्रकट केली. निक्सन हे जरी जगातील सर्वांत धनाढ्य व विकसित राष्ट्राचे अध्यक्ष होते तरी जिवावर उदार होऊन ज्यांनी चंद्राची सफर केली त्या आर्मस्ट्रॉंग व एल्ड्रिन यांना भेटण्याची त्यांनीही इच्छा प्रकट केली. एवढेच नव्हे तर त्यांच्या अद्‌भुत पराक्रमाची बातमी साऱ्या जगाने वर्तमानपत्रांतून वाचली.

तात्पर्य, गुणांच्या बळावरच माणूस उच्च पद प्राप्त करतो व त्याला यश व सुख मिळतो. परंतु या जगात कोणत्याही माणसात सर्व सद्‌गुण नाहीत आणि निर्विकारीपणा किंवा मनवचन-कर्माची संपूर्ण पवित्रता तर कोणातही नाही. आता परमपिता परमात्मा आम्हास जे ईश्वरी ज्ञान व सहज राजयोग शिकवित आहे, त्याचा उद्देश आम्हास सर्व दैवी गुणांनी संपन्न करणे व संपूर्ण निर्विकारी बनविणे हाच आहे. जर आज लोकांचे लक्ष या दैवी गुणांकडे व परमपिता परमात्म्याच्या या अद्‌भुत कार्याकडे वळेल तर केवळ सूर्य व चंद्र यांच्या पलीकडील लोकात जाणे वा

त्यांना जाणणे शक्य होईल. एवढेच नव्हे तर ही सारी सृष्टीच स्वर्ग किंवा देवभूमी बनून विश्वात शांती प्रस्थापित होणे सहज शक्य होईल आणि तसे प्रयत्न चालूही आहेत.



# विज्ञान ईश्वरी ज्ञानाचे समर्थक व सहाय्यक आहे की त्याला विरोध करणारे व बाधक आहे

**गे**ल्या दीडशे वर्षांत विज्ञानाने फारच आश्चर्यकारक प्रगती केलेली आहे. विज्ञानाच्या नवीन शोधांमुळे हजारो वर्षांच्या भ्रामक धार्मिक समजुती धुळीस मिळाल्या आहेत. उदाहरणार्थ, जेव्हा अंतराळवीरांनी अंतरिक्षयानाने चंद्रावर जाऊन तिथला समाचार दिला की चंद्र निर्जन असून तेथे पाणीसुद्धा नाही, तेव्हा चंद्रावर स्वर्गलोक आहे आणि तेथे देवी-देवता निवास करतात व मध, तूप इत्यादींच्या नद्या वाहतात ही जी एक समजूत होती तिला मूठमाती मिळाली. प्राचीन काळापासून बहुतेक सर्व धर्मसंप्रदाय असे मानत आले होते की, चंद्रावर स्वर्ग आहे. त्याला पुरावा म्हणून ते एक तर असे प्रतिपादन करीत की, हे ज्ञान त्रिकालदर्शी व सर्वज्ञ अशा परमात्म्याने स्वतः वेदाच्या रूपाने दिले किंवा असे म्हणत की, चंद्रावरील स्वर्ग पतंजली इत्यादी त्रिकालदर्शी ऋषीमुनींनी प्रत्यक्ष पाहिलेला आहे. जैन लोकही आपल्या अर्हत, सिद्ध, मुनी इत्यादी आप्त पुरुषांद्वारे प्राप्त झालेले हे एक सत्य आहे असे मानत आले आहेत. याचप्रमाणे अन्य धर्मीय लोकही चंद्रावर स्वर्ग असणे हे साक्षात्कारी पुरुषांनी प्रकट केलेले सत्य आहे असे मानत आलेले आहे. आता अंतरिक्षाच्या सफरीनंतर या सर्वांच्या चंद्राबद्दलच्या समजुती खोट्या सिद्ध झाल्याने साहजिकच त्यांचे परमात्मा व योगविषयक सिद्धांतही चुकीचे ठरतात किंवा असे म्हणता येईल की, त्यांचे सर्व सिद्धांत एखाद्या अल्पज्ञ माणसानेच कल्पिले असावेत असेच सिद्ध होते. अशा तऱ्हेने चंद्राविषयी नव्यानव्या सत्य गोष्टी जेव्हा प्रकाशात आल्या तेव्हा बऱ्याच धर्ममार्तंडांनी रागाने वैतागून जाऊन काही विचित्र गोष्टी सांगण्यास सुरुवात केली. त्यांपैकी काही जणांनी सांगितले की, अंतराळवीर चंद्रावर गेलेच नाहीत. एवढेच नव्हे तर शास्त्रांत ज्या चंद्राचे वर्णन आहे तो हा चंद्र नव्हेच, तो दुसराच आहे. अन्य काही जण म्हणाले की, देवता तर अति सूक्ष्म असतात, त्या पाश्चात्य देशांतून गेलेल्या अंतराळवीरांना ते म्लेच्छ व आसुरीवृत्तीचे असल्याने दिसल्याच नाहीत.

## वैज्ञानिक शोधांमुळे अन्य काही भ्रामक धार्मिक समजुतींवर आघात

अशा प्रकारच्या वैज्ञानिक शोधांमुळे आणखी काही तथ्ये (Facts) लोकांपुढे आली आहेत ज्या योगे पूर्वीच्या कित्येक धार्मिक समजुती खोट्या ठरल्या आहेत. परंतु 'प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालयात' परमपिता परमात्मा जे ज्ञान देत आहे ते वरील सर्व तथ्ये सिद्ध करते. येथे त्यांपैकी काहींचा उल्लेख करणे योग्य ठरेल.

शरीरविज्ञान आणि शस्त्रवैद्यकीय (Surgery) यांत विशेष प्रवीण असलेल्या तज्ज्ञांनी गेल्या काही वर्षांत हृदयारोपणाचेही (Heart-transplantation)प्रयोग केले आहेत. यांनी हृदयातील मूळच्या झडपा काढून टाकून त्यांऐवजी प्लास्टिक झडपाही बसविल्या आहेत आणि काही काळ यांत्रिक हृदयाचा (Mechanical Heart)उपयोग करून माणसाला जिवंत ठेवण्यातही यश मिळविले आहे. विज्ञानाच्या या प्रयोगांनी व ज्ञानाने 'आत्मा हृदयरूपी गुहेत निवास करतो' ही जी पूर्वापार चालत आलेली शास्त्रसंमत समजूत होती ती निराधार असल्याचे सिद्ध केले आहे. एवढेच नव्हे तर गीतेत हे जे भगवंताचे महावाक्य आहे की, "मी सर्वांच्या हृदयांत सन्निविष्ट असतो," ते सुद्धा प्रक्षिप्तच ठरले आहे आणि 'भ्रुवोर्मध्ये....या श्लोकात भृकुटींमध्ये आत्मा निवास करतो असे जे प्रतिपादन केले आहे ते यथार्थ असल्याचे सिद्ध झाले आहे. परंतु अद्यापही काही लोक हृदयरूपी गुहेत परमात्म्यासमवेत आत्मा निवास करतो असे मानण्याचा जो अट्टाहास करतात त्याला दुराग्रहच म्हणावे लागेल.

## परमात्म्याच्या सर्वव्यापीपणाचा सिद्धांत आता निराधार

वैज्ञानिकांनी अग्निबाण (Rocket)व अंतरिक्षयान (Space Ships) यांचा उपयोग करून अंतराळात भ्रमण करण्यात कल्पनातीत यश मिळविले आहे त्यामुळे आणखी कित्येक तथ्ये लोकांपुढे आली आहेत. उदाहरणार्थ एक असे की, माणूस वेधशाळेत (observatory) किंवा भूस्थित नियंत्रणालयात (Ground Control room) बसूनही भूमंडळापासून दूरवर सौरमंडळात

गेलेल्या यंत्रांना व यांत्रिकांना विद्युत-चुंबकीय साधनांद्वारे (Electro-Magnetic means of Control) आदेश (Direction) देऊ शकतो आणि बिनतारी यंत्र, रेडिओ, टेलिव्हजन, टेलिफोटो इत्यादी साधनांद्वारे त्यांच्याशी बोलूही शकतो, त्यांची छायाचित्रेही (Photo)घेऊ शकतो व त्यांना पाहूही शकतो. पृथ्वीवरील नियंत्रणालयाद्वारे (Remote Ground Control) दूरस्थ यंत्राना तो आदेशही देऊ शकतो व त्यांच्या हालचालीवर नियंत्रण ठेवू शकतो. त्यामुळे धर्मनिष्ठांची जी एक समजूत होती की, "परमात्मा सर्वत्र नसेल तर तो सर्वांना पाहू व जाणू शकणार नाही आणि त्यांना कर्मभोगाची शिक्षाही देऊ शकणार नाही; म्हणून परमात्म्याला सर्वव्यापी मानणे आवश्यक आहे," ती मिथ्या तर्कावर आधारलेली व निरर्थक सिद्ध होते. वैज्ञानिक लोक प्रकृतीच्या सूक्ष्म शक्तींवर ताबा मिळवून कोट्यवधी मैल दूरवर असलेल्या मोठ्या यंत्रांना तेथे स्वतः उपस्थित नसता आणि कोणत्याही स्थूल संपर्काशिवाय जर नियंत्रित करू शकतात व त्यांच्याशी संपर्क साधू शकतात, तर काय सर्वशक्तिमान, परमवैज्ञानिक परमात्मा (जर त्याला वाटल्यास) परमधामनिवासी असूनही माणसांना 'यंत्रारूढ' व्यक्तींप्रमाणे पाहू वा जाणू शकणार नाही? विज्ञानाच्या या शोधांमुळे परमात्मा सर्वव्यापी आहे ही लोकांची पूर्वीची समजूत माणसाच्या अल्पज्ञतेवर आधारलेली आहे हे निश्चितच सिद्ध होते. ही पुरातन समजूत सिद्ध करण्यासाठी मांडले गलेले तर्क जरी सकृत्दर्शनी बरोबर वाटत असले तरी वस्तुतः ते निरर्थक आहेत. त्यांना हेत्वाभास म्हणणेच योग्य ठरेल.

### मनाविषयी मानवीय तथ्ये

याचप्रमाणे मानसशास्त्रात मनाच्या सचेत जागृत (Conscious) अर्धचेत, अर्धजागृत (Sub-conscious) आणि अचेत (सुप्त Uncon*n* scious) या ज्या तीन अवस्था निश्चितपणे मान्य केल्या आहेत त्यामुळे मन हे प्रकृतिकृत आहे ही जी धर्मनिष्ठांची समजूत आहे तिच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतात. माणसाच्या मूळ स्वाभाविक प्रवृत्ती (Basic Instincts) व कल (Tendencies) यांविषयी केलेल्या संशोधनाच्या आधारे मानसशास्त्र

म्हणतात की, या प्रवृत्ती माणसात अनादी व अनंत काळापासून आहेत. यावरून या प्रवृत्ती स्वभावतः आत्म्याच्याच प्रवृत्ती आहेत हे सिद्ध होते. कारण आत्माच अनादी सत्ता आहे ज्यात या प्रवृत्ती सुरक्षित आहेत. प्रकृती ही तर क्षणोक्षणी बदलत असते व शरीर हे नश्वर आहे. टेप रेकॉर्ड व ग्रामोफोन रेकॉर्ड यांच्या उदाहरणांवरून स्पष्ट होते की, ज्यात जन्मोजन्मीच्या स्मृती, कृती व प्रवृत्ती सुरक्षित असतात ते मन जर प्रकृतिकृत असते तर आत्म्याच्या जन्मोजन्मीच्या रेकॉर्डासाठी न जाणो मनरूपी इलेक्ट्रोमॅग्नेटिक टेप वा ग्रामोफोन रेकॉर्ड किती मोठी असावयास लागेल !ती शरीरातच नव्हे तर साऱ्या पृथ्वीवरही सामावू शकली नसती. तसेच, ज्ञान (Cognition), इच्छा (Conation), क्रिया (Action) व आवेग (Emotion) ही जी मनाची चार वैशिष्ट्ये मानली गेली आहेत त्यांवरूनही मन प्रकृतिकृत नसून चैतन्य आत्म्याच्याच स्वाभाविक कार्यशक्तींचे उपनाव आहे हे सिद्ध होते. आवेगासंबंधी मानसशास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनावरून हेही निश्चित झाले आहे की, लेप आणि विक्षेप हे आत्म्यालाच लागतात आणि मनोविकार हे शारीरिक स्वास्थ्य तसेच मानसिक समतोलपणा या दृष्ट्या माणसाला घातक आहेत कारण मनोविकारांच्या उत्पत्तीने शरीरात असे कित्येक स्त्राव (Secretions) निर्माण होतात जे रोगांना जन्म देतात व अशांती उत्पन्न करतात.

## पूर्वीच्या अनेक दार्शनिक सिद्धांतांचे खंडण

अशा रितीने, परमात्म्याचे स्वरूप (सर्वव्यापी वा एकदेशी असणे), आत्मा अणू वा विभू असणे व त्याने हृदयात किंवा भृकुटींत निवास करणे, मन प्रकृतिकृत असणे किंवा खुद्द आत्म्याच्याच काही अनादी क्षमता असणे, तसेच स्वर्ग कोठे आहे व कसा आहे इत्यादी विषयासंबंधित समजुती भ्रामक ठरल्याने पूर्वीचे कित्येक दार्शनिक सिद्धांतांचे खंडण झाले आहे. वैशषिक दर्शनात हे जे प्रतिपादन केले आहे की, अमुक-अमुक यज्ञ केल्यास स्वर्गाची प्राप्ती होते ती स्वर्गाविषयीची समजूत निराधार ठरल्याने अनाठायी सिद्ध होते. त्याचप्रमाणे अमुक-अमुक यौगिक क्रिया केल्याने किंवा विशिष्ट ध्यानाने अमुक-अमुक

'लोकाचे' ज्ञान माणसाला प्राप्त होते असे जे पातंजलीच्या योग-दर्शनात लिहिलेले आहे त्यालाही चंद्राविषयीच्या नव्या वैज्ञानिक संशोधनामुळे जबरदस्त धक्का बसला आहे. त्यामुळे यम-नियमांचे शाश्वत सिद्धांत सोडून इतर सिद्धांतांवरची लोकांची निष्ठा पूर्वीप्रमाणे कायम राहणे अशक्य झाले आहे.

## विज्ञानापासून खऱ्या ज्ञानाला कसलाही धोका नाही

'प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालयात' गेल्या पन्नासाहून अधिक वर्षे जे ईश्वरी ज्ञान दिले जात आहे त्याला या वैज्ञानिक शोधांमुळे पुष्टीच मिळते. अध्यात्मवादी व सत्यान्वेषी लोकांना ही खरोखरच आनंदाची गोष्ट आहे.

विज्ञानाने अध्यात्मवादाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण केला आहे असे काही लोक म्हणतात. परंतु त्यात काही तथ्य नाही. निःसंशय विज्ञानाने रूढी, कर्मकांड, अंधश्रद्धा, पौराणिक कथा, (Mythology) व दम नसलेल्या सांप्रदायिक समजुती इत्यादींवर तीव्र आघात केले आहेत; परंतु त्यामुळे लोक जागृत झाले आहेत आणि ते विवेकाचा उपयोग करू लागले आहेत तसेच 'सत्य वचन महाराज' हा परिपाठ सोडून, गंभीरपणे विचार करू लागले आहेत. अशा रीतीने भौतिक विज्ञानाने, स्वतः फार मोठे विज्ञान असणाऱ्या आणि प्रकृति संबंधी विज्ञानाहूनही अधिक शक्तिशाली, सूक्ष्म व मोठे असणाऱ्या सत्य ईश्वरी ज्ञानाला मार्ग मोकळा करून दिला आहे.

सांप्रत विज्ञानाने गणकयंत्र (Computer)व यांत्रिक मनुष्य (Robot) यांचा जो शोध लावला आहे त्याने अध्यात्मवादाला धोका निर्माण केला आहे असे कित्येक अध्यात्मवादी लोक मानतात. परंतु वस्तुतः त्यांची ही भीती व्यर्थ आहे. कॉम्प्यूटर, रोबॉट ही एक प्रकारची यांत्रिक माणसेच आहेत ही गोष्ट बरोबर आहे. वैज्ञानिक त्यांचा उपयोग एखाद्या माणसाप्रमाणे विचार करण्यासाठी, निर्णय घेण्यासाठी व कार्य करण्यासाठी करू शकतो. परंतु माणसात जशा प्रेम, शांती, आनंद, आवेग, पूर्व-स्मृती, संस्कार, संबंधांची जाणीव मृत्यूची भीती किंवा अमरत्वाची व मुक्तीची इच्छा वगैरे असतात तशा त्या कॉम्प्यूटर व रोबॉटात नसतात. कॉम्प्यूटर वा रोबॉट कार्य जरूर करतात परंतु त्यांच्यांत

कार्यप्रवण वृत्ती किंवा त्यापासून निवृत्त होण्याची इच्छा, एखाद्याबद्दल श्रद्धा वा भावना वगैरे नसतात. म्हणून या शोधांमुळे हे सिद्ध होते की, मेंदू (Brain)हा सुद्धा शरीरातील एक प्रकारचा लघु-कॉम्प्यूटर (Mini Computer)आहे किंवा मेंदू स्नायूंचे जाळे, ज्ञानतंतूचे जाळे व शरीर मिळून आत्म्यासाठी एक रोबॉटच होय. त्यांच्याकडून कार्य करवून घेणारा अनुभवशील,इच्छा-युक्त, पुरुषार्थवान, चैतन्य व अनिवाशी असा आत्मा त्यांपासून भिन्न आहे. तेव्हा, जे लोक आतापर्यंत आत्म्याचे अस्तित्व न मानता शरीरातील मेंदू, हृदय, स्नायुक्रिया इत्यादींकडे पाहून शरीराला स्वयंचलित सर्वस्व मानत आले आहेत त्यांना आता हे शोध म्हणजे एक प्रकारचे आवाहनच आहे. कारण ही आत्म्याची उपकरणे आहेत अर्थात त्यांच्याहून वेगळी एक चैतन्य सत्ताही आहे जिला 'आत्मा' म्हणतात.

या लेखाचे स्वरूप लहानसे आहे. त्यामुळे यात अध्यात्मवादाच्या दृष्टिकोनातून सर्व वैज्ञानिक शोध व निष्कर्ष यांची चर्चा करता येणे शक्य नाही. वरील काही उदाहरणांवरून केवळ ही गोष्ट सिद्ध करणे इष्ट आहे की, विज्ञान ईश्वरी ज्ञान प्रमाणभूत करण्यात सहाय्यक आहे. एवढे खरे की, ज्या विषयांत सध्या स्वतः विज्ञानच बाल्यावस्थेत आहे त्या विषयींचे विज्ञानाचे निष्कर्ष काहीसे विसंगत असू शकतील. अन्यथा, विज्ञान केवळ ईश्वरी ज्ञानाचे परोक्ष व अपरोक्षरीत्या समर्थक आहे एवढेच नव्हे तर ईश्वरी ज्ञानाद्वारे सत्ययुगी, संपूर्ण पवित्रता, सुख व शांतिसंपन्न सृष्टी स्थापन करण्याची जी ईश्वरी योजना आहे, त्यातही विज्ञान अशातऱ्हेने सहाय्यक आहे की, त्याद्वारे निर्माण केल्या गेलेल्या आण्विक अस्त्र-शस्त्रांच्या माध्यमाने कुवासना, दुर्व्यसने, दुर्भावना व दुराचार यांनी युक्त अशा कलियुगी पतित सृष्टीचा महाविनाश होऊन सत्ययुगी देवी-देवतांच्या पुनरागमनाचा मार्ग मोकळा होईल.

# परमात्मा काय देतो व विज्ञान काय देते?

**आ**जचे युग हे विज्ञानाचे युग आहे. प्रत्येक माणूस विज्ञानाच्या चमत्काराला नमस्कार करीत आहे. विज्ञानाने माणसाला सर्व प्रकारच्या सुखसोयी उपलब्ध करून दिल्या आहेत, परंतु तरी देखील आज कोणी शारीरिक रोगामुळे तर कोणी जवळ पैसा नसल्यामुळे आणि कोणी नैसर्गिक कोपांमुळे पीडित आहे. सर्व प्रकारच्या दुःखांपासून मुक्त व्हावे असे प्रत्येक माणसाला वाटते. कमीतकमी काम करून जास्तीतजास्त कमाई करण्याची प्रवृत्ती माणसात बळावत आहे.

विज्ञानाचे युगाला 'यंत्र युग' असेही म्हटले जाते. विज्ञानाने आज हाडामासाच्या माणसांकडून काम करविणे बंद करून लोखंडी पुरुषांकडून (यंत्रांकडून) काम करविणे सुरू केले आहे. परंतु विज्ञानाने माणसाला संपूर्ण सुखी केले आहे का किंवा विज्ञानाला सुखदाता म्हणता येईल का हे पाहणे उद्‌बोधक ठरेल. विज्ञानाने आज इतकी कमालीची प्रगती केली आहे की त्याने माणसाला विश्वव्यापी दूरदर्शन (Television)उपलब्ध करून दिला आहे, दूरदर्शक यंत्रही (Telescope)बहाल केले आहे, सूक्ष्मदर्शन यंत्र (Microscope)निर्माण केले आहे. एवढेच नव्हे तर चंद्रावरही विजय मिळविला आहे. यांमुळे संपूर्ण सुख-शांती प्राप्त करणे हे जे माणसाच्या जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे ते पूर्ण झाले आहे का? विज्ञानाद्वारे संपूर्ण सत्याचे दर्शन (ज्ञान) होऊ शकते का?

**विज्ञान काय देते, परमात्मा काय देतो?**

विज्ञानाने जरी आज फार प्रगती केलेली असली तरी विज्ञानालाही सीमा आहे. विज्ञान अणूचे विच्छेदन करून इलेक्ट्रॉन, प्रोटॉन व न्युट्रॉनपर्यंत जाऊन पोहोचले आहे. परंतु काही झाले तरी अणू ही जड (अचेतन) वस्तू आहे. त्याहूनही सूक्ष्म सत्ता म्हणजे 'आत्मा' असून तो चैतन्य शक्ती आहे. त्याचे ज्ञान फक्त परमात्माच करून देतो. आत्मा हा मन, बुद्धी, संस्कारसहित आहे. विज्ञानाच्या सूक्ष्मतेत जशी अधिक शक्ती आहे तसेच आत्म्याच्या उपरोक्त सूक्ष्म शक्तीत अधिक सामर्थ्य आहे व त्यांचे ज्ञान परमात्मा देतो. विज्ञानाद्वारे भौगोलिक परिस्थिती किंवा पृथ्वीचे आयुष्यमान कळून येत असेल परंतु सृष्टीच्या

आदि–मध्य अंताचे ज्ञान केवळ परमात्माच देतो. शरीराच्या अवयवांत बिघाड निर्माण झाल्यास त्यावर इलाज करू शकते; डोळे बिघडल्यास चष्मा देते, कानाने ऐकू येत नसल्यास ऐकण्याचे यंत्रही देते. एवढेच नव्हे तर हृदयारोपणही करते. परंतु कोणताही अवयव कधी बिघडूच नये अर्थात सदानिरोगी, सदाधनवान, सदासुखी (Ever healthy-Ever Wealthy, Ever-Happy)कसे व्हावे किंवा 'अमर पद' कसे प्राप्त करावे याचे ज्ञान परमात्माच देतो.

जर अगदी बारकाईने निरीक्षण केले तर वैज्ञानिकांनी काही विशेष आश्चर्यकारक कार्य केले नाही असे दिसून येईल. परमात्मा जी गोष्ट घडण्यापूर्वी सांगतो ती वैज्ञानिक प्रथम प्रयोगशाळेत करून पाहतो आणि नंतरच सांगू शकतो. वैज्ञानिक शोध (Invention)लावतो असे लोक समजतात. वास्तविक वैज्ञानिक आपल्या संस्कारांच्या स्मृतीच्या आधारेच नवे संशोधन करतो. शोध (Invention) नव्हे. कारण आत्म्यात ते संस्कार आधीपासूनच सामावलेले असतात आणि योग्य वेळ येताच एखादे निमित्त घडते व वैज्ञानिकाचे संस्कार ते संशोधन करण्यास पुन्हा जागृत होतात. विज्ञानाचा इतिहास ज्ञात असलेलें लोक जाणतात की, जेम्म वॉटने पाणी उकळत असताना जेव्हा वाफेच्या शक्तीचा प्रताप पाहिला तेव्हा त्याने पहिले वाफेचे इंजिन बनविले. अशाच प्रकारे, वीज, टेलिफोन इत्यादींचे संशोधन केले गेले. परमात्मा हा सर्वात महान वैज्ञानिक असून तो संशोधन करीत नाही तर 'ज्ञान' देतो. उलटपक्षी वैज्ञानिकाचे सर्व आयुष्य छोटयाशा संशोधनातच संपुष्टांत येते. वैज्ञानिक संशोधन करून उन्नती जरूर करतात, सुखसोयीही उपलब्ध करून देतात परंतु त्यांनी प्राप्त करून दिलेल्या साधनांमुळे दुःख कायमचे दूर होत नाही. परंतु परमात्मा आध्यात्मिक ज्ञान देऊन सर्व दुःखापासून मुक्त करतो.

### धर्मज्ञान हेही एक प्रकारचे विज्ञानच आहे

धर्मालाही 'विज्ञान' (Science)म्हटले जाते. ज्याप्रमाणे विज्ञान क्रिया (Action)व त्याची होणारी प्रतिक्रिया (Reaction)याचे नियम सांगते त्याप्रमाणे परमात्माही आध्यात्मिक जगाचे नियम सांगतो. विज्ञान भौतिक

जगापुरते मर्यादित आहे. ईश्वरी विज्ञान हे आध्यात्मिक संशोधन आहे. ज्याप्रमाणे विज्ञानाचे नियम प्रत्येक माणसाला व प्रत्येक स्थानाला लागू पडतात, त्याचप्रमाणे ईश्वरी विज्ञानाचे नियम प्रत्येक माणसाला व प्रत्येक स्थानाला लागू पडतात. उदाहरणार्थ, एखादा माणूस जेव्हा देहाभिमानाच्या अधीन होऊन रागावतो तेव्हा त्याचे पर्यवसान दुःखात जरूर होते, मग तो माणूस हिन्दू, मुसलमान, ख्रिश्चन कोणीही असो. प्रत्येक व्यक्तीला हा नियम लागू पडतो. भौतिक विज्ञानाचा प्रयोग प्रयोगशाळेत केला जातो. आध्यात्मिक विज्ञानाची प्रयोगशाळा म्हणजे माणसाचे जीवन होय. भौतिक विज्ञान साकार सृष्टीपुरते मर्यादित आहे. परंतु परमात्मा तर साकार सृष्टीच्याही पार पलिकडे असलेल्या अखंड ज्योतिर्मय तत्त्वाची अनुभूती करून देतो. जसे दूरदर्शनाच्या (Televisions)शोधामुळे जगातील घडामोडी प्रत्यक्ष डोळ्यांना दिसतात तसेच त्रिकालज्ञानी परमात्मा भूत, वर्तमान व भविष्य या तिन्ही काळांचा साक्षात्कार दिव्य-दृष्टी वा दिव्य-बुद्धीद्वारा करवितो. संत मीराबाई व चुडाला याअंतर्वाहक शरीर धारण करून अशा रीतीने सूक्ष्म लोकात प्रस्थान करीत या गोष्टीचे स्पष्टीकरण विज्ञान देऊ शकते काय? मीराबाईला श्रीकृष्णाचा साक्षात्कार घडला परंतु मीराबाईच्या काळी तर श्रीकृष्ण नव्हता! दिव्यदृष्टीचे व दिव्यबुद्धीचे वरदान स्वतः परमात्मा देतो म्हणून 'दिव्य-दृष्टिदाता' व 'दिव्यबुद्धिविधाता' असे म्हटले जाते. मनुष्यात्म्यांच्या शरीराकृतीत भिन्नता का आढळते? एकाच कारखान्यात निर्माण होणाऱ्या चार वस्तूंचे नमुने जसे सारखे असतात तसे एकाच आईबापाच्या पोटी जन्म घेणारी चार मुले सारखी का नसतात? या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे विज्ञान देऊ शकते का? वास्तविक आध्यात्मिक विज्ञानाद्वारे परमात्माच स्पष्टपणे सांगतो की, भिन्न-भिन्न संस्काराचे आत्मे कशा प्रकारे भिन्न-भिन्न रंग, रूप व आकार असलेली शरीरे धारण करतात. या व्यतिरिक्त, इतके संततिनियमन (Birth Control) करूनही लोकसंख्या इतकी का वाढते? कारण आत्मे ब्रह्मतत्त्वात निवास करीत असतात व आपल्या समयानुसार सृष्टीच्या रंगमंचावर आपापल्या भूमिका वठविण्यासाठी येतात. विज्ञान पुनर्जन्माचे (Rebirth)ज्ञान देऊ शकते का? परमात्मा तर आत्म्याच्या चौऱ्यांशी जन्मांच्या इतिहासाचे ज्ञान ऐकवितो.

## विज्ञान संपूर्ण व शाश्वत सुख देण्यास असमर्थ

जरी विज्ञानाने कमालीची प्रगती केलेली असली तरी ते माणसाला संपूर्ण सुखी बनवू शकलेले नाही. अन्यथा स्वतः अल्प वैज्ञानिक संपूर्ण सुखी झालेला दिसला असता. अल्प बुद्धी आत्म्याच्या संशोधनातही एखादी त्रृटी जरूर राहून जाते. वास्तविक संपूर्ण व सर्वात महान वैज्ञानिक एक परमात्माच आहे जो विज्ञानाच्याही सत्त्वप्रधान अवस्थेचे ज्ञान देतो. जेव्हापासून अल्पज्ञ आत्म्याद्वारे विज्ञानाच्या संशोधनाला प्रारंभ झाला तेव्हापासून माणूस जो देवता होता तो माकड बनला आहे. अर्थात त्याची वृत्ती पाशवी बनली आहे, परंतु 'मानुष से देवता किये करत न लागी वार' हा गुरु नानकाने गायलेला महिमा केवळ परमात्म्याचाच आहे, विज्ञानाचा नव्हे.

## चारित्र्याची उन्नती करण्यात विज्ञान असमर्थ

विज्ञानाने माणसाला सर्वगुणसंपन्न, सोळा कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकार नव्हे तर संपूर्ण विकारीच बनविले आहे. मनुष्यात्म्याच्या चारित्र्याची घडण किंवा नैतिक उन्नतीही विज्ञानाने केली नाही. याच कारणामुळे ज्या वस्तू सुखदायी आहेत त्याच दुःखदायीही बनतात. जे ॲटम बॉंब संरक्षणाचे साधन म्हणून बनविले गेले आहेत तेच पुढे विनाशाला कारणीभूत होतील. ज्या विमानांतून प्रवास केला जातो तीच विमाने मृत्यूचे भयही उत्पन्न करतात.

आज लोक प्रकृतीला विज्ञानाच्या शक्तीने नियंत्रित करतात परंतु तरी देखील प्रकृती 'दासी' म्हणवून घेत नाही. उदाहरणार्थ, ते म्हणतात की, रावणाने आपल्या पलंगाच्या चारही पायांना जल, वायू, अग्नी व काळ यांच्या देवतांना बांधून ठेवले होते. तेच रावणयुग सध्या चालू नाही काय? भाक्रा-नांगल धरण सर्वांना माहीत आहे. तेथे धरण बांधून पाणी अडवून ठेवले आहे. बटन दाबतच वीज व पंखा चालू होतो, हीटर प्रज्वलित होतो. अग्निबाणाद्वारे अल्पावधीत चंद्रावर जाता येते. प्रकृतीची ही सर्व तत्त्वे काबूत तर आणली आहेत, तरी प्रकृती दासी म्हणवून घेत नाही. परंतु देवी-देवतांची प्रकृती ही दासी होती.

## सत्ययुगाचे लाभ

विज्ञान हे काही वाईट नाही. परंतु **सांप्रत मनुष्यात्म्यांची अवस्था** सत्त्वगुणी नसल्याने त्याचा सदुपयोग होत नाही. सत्ययुगातही विज्ञान प्रचलित होते परंतु विज्ञानाचे संशोधन होत नव्हते. निसर्गतःच सर्व सुखसोई **उपलब्ध होत्या.** तेथे कोणताही शारीरिक रोग नव्हता. त्यामुळे क्ष-किरणे व औषधांचे संशोधन करण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता. कोणत्याही प्रकारे प्रकृतीचा कोप होत नव्हता. धन-धान्याची कोणतीही समस्या नव्हती. पुष्पक विमाने प्रचलित होती आणि रत्नजडित सुवर्ण महालही होते, परंतु जसजशी माणसाची अवस्था खालावत गेली तसतशी भौतिक विज्ञानाची प्रगती होत गेली व जीवन दुःखी व अशांत बनत गेले. विज्ञानाने जसे सर्व वस्तूंचे प्रकार कळून येतात तसे सृष्टीच्या संपूर्ण चक्राचे किंवा नियमांचे ज्ञानही परमात्मा देतो. वैज्ञानिक जशी प्रत्येक गोष्ट युक्तियुक्त व तर्कशुद्धरीत्या जाणू इच्छितो त्याचप्रमाणे त्याने परमात्म्यालाही वैज्ञानिक पद्धतीनेच जाणावयास हवे.

लोकांनी विज्ञानाचा अर्थ नास्तिकवाद असा घेतला आहे. परंतु खरे वैज्ञानिक हे कधीही नास्तिक नसतात. त्यांच्या बुद्धीत ही गोष्ट सूक्ष्मपणे असते की जरूर कोणती तरी अज्ञात व संपूर्ण शक्ती कार्य करीत आहे, मग अहंकारवश ती ते मान्य करीत नसले तर तो प्रश्न अलग आहे. त्या संदर्भात मला एक गोष्ट आठवते. एकदा लोकांनी एका वैज्ञानिकाला सांगितले की, परमात्मा नाही हे तू सिद्ध करून दाखव. त्याने आपल्या तार्किक पद्धतीचा अवलंब करून परमात्मा नाही हे सिद्ध करण्याची पराकाष्ठा केली. जेव्हा लोकांनी परमात्मा नाही हे त्याचे म्हणणे मान्य केले तेव्हा तो उद्‌गारला, "मी परमात्म्याचा आभारी आहे की परमात्मा नाही हे एकदाचे सिद्ध झाले' (Thank God, that I have proved that there is no God) पाहा, जर परमात्माच नाही व तेही त्या वैज्ञानिकानेच सिद्ध करून दाखविले तर त्याने आभार मानले ते कोणाचे? परमात्मा ही काही अशी वस्तू नाही की जिला प्रयोगशाळेत इतर वस्तूंप्रमाणे प्रयोग, निरीक्षण व निष्कर्ष या पद्धतीने जाणणे शक्य आहे. परमात्मा तर चैतन्य,

अतिसूक्ष्म ज्योतिर्बिंदू असून ज्ञानाचा सागर, आनंदाचा सागर, सर्वशक्तिवान व सर्वात महान वैज्ञानिक आहे आणि त्यालाच सृष्टीचा नियंता व सर्व सुखांचा दाता म्हटले जाते.

## परमात्म्याचा परिचय

परमात्म्याला इंग्रजीत 'God' म्हणतात. God या शब्दात तीन अक्षरे आहेत. या तीन अक्षरांनी परमात्म्याचे कर्तव्य सिद्ध होते, जसे G-Generator, O-Operator व D-Destroyer. म्हणजे स्थापना, पालन व विनाश करणारा असल्याने परमात्म्याला 'God' म्हणतात. परमपिता परमात्मा साकार प्रजापिता ब्रह्म्याद्वारे जे ज्ञान आम्हास देत आहे त्यामुळे आपण आत्मे विदेही होतो व बुद्धियोग परमात्म्याशी जोडून सर्व गोष्टींचा अनुभव करतो. ईश्वरी किंवा आध्यात्मिक ज्ञान—विज्ञानाद्वारे स्वर्गाची स्थापना होते. जर आपण निव्वळ भौतिक वैज्ञानिकच राहू तर भौतिक विज्ञान आम्हास विनाशाकडे जरूर घेऊन जाईल. म्हणून आता आम्हास नव्या जगाच्या (सत्ययुग) स्थापनेचे संस्कार आपल्यांत भरावयास हवेत.

# धर्म आणि विज्ञान यांमधील विषमता कशी दूर होईल?

**प्र**त्येक युगाचे जरूर कोणते ना कोणते तरी वैशिष्ट्य असते. तसेच सध्याच्या युगाचेही आपले असे आगळे वैशिष्ट्य आहे त्याचे मुख्य वैशिष्ट्य आहे **विभिन्नता** व **विषमता.** विचारांती याचे मूळ कारण **अज्ञान** किंवा **अपूर्णज्ञान** आहे असे आढळून येईल. आता हे अज्ञान वा अपूर्णज्ञान दूर करून ज्याद्वारे ऐक्य साधता येईल अशा ज्ञानाकडे व विचारांकडे मानवमात्राला वळविणे आवश्यक आहे. कारण जोपर्यंत आपण विचारांतील विभिन्नता व विषमता दूर करणार नाही तोपर्यंत ऐक्य प्रस्थापित होणे व जगाच्या समस्या दूर होणे कालत्रयीही शक्य होणार नाही.

आज विभिन्नता व विषमता फारच बळावलेली दिसत आहे. आपण प्रगतीपथावर असूनही विषमता म्हणजे 'मतभेद' शब्द दूर न करता केवळ एवढेच म्हणतो कि, चला, आपल्यांत मतभेद आहेत याबाबतीत तरी आपण सहमत होऊ या (Let us agree to disagree) अथवा आपण 'सहिष्णुता' या शब्दाचा उपयोग करून एकमेकांच्या विचारांशी सहमत नसतानाही ते विचार मान्य करणे एवढेच पसंत करतो आणि जर ते अमान्य केले तर वितंडवाद घालत बसतो.

### धर्म व विज्ञान एकमेकांना पूरक

याचप्रमाणे आज 'धर्म' व 'विज्ञान' यांतही विषमता निर्माण झालेली आढळते. परंतु वास्तविक दोन्ही एकमेकांना पूरक आहेत, जसे आत्मा व शरीर आहेत. आपण आत्मा व शरीर यांना वेगवेगळे करू शकत नाही. कारण तसे केल्यास उभयतांना एकाकीपणे काहीही करता येत नाही. निष्प्राण शरीर काहीच करू शकत नाही तसेच शरीराशिवाय आत्माही काहीच करू शकत नाही. याचप्रमाणे, आपल्या जीवनातही, धर्म व विज्ञान या उभयतांची तेवढीच नितांत आवश्यकता आहे.

## सांप्रत धर्माचे स्वरूप काय आहे?

धर्म हा आम्हा मनुष्यात्म्यांचा कर्मक्षेत्रावरील मार्गदर्शक आहे. परंतु आज त्यातील सिद्धांत काहीसे चमत्कारिक झालेले असल्याने धर्माबद्दल लोकांना आस्था वाटेनाशी झाली आहे. आज जर आपण पाहिले तर धर्माचे तीन विभाग झालेले आपणास आढळून येतील. ते विभाग म्हणजे (१) कर्मकाण्ड, (२) कथा-कीर्तन, (३) दर्शन (ज्ञान) होत. वस्तुतः धर्माचा संबंध दर्शनाशी अर्थात ज्ञानाशी आहे. कर्मकाण्ड व कथा-कीर्तन यांच्याशी त्याचा सुतराम संबंध नाही. आज धर्म बहुधा कर्मकाण्ड व कथा-कीर्तन यांच्या स्वरूपातच दिसतो. त्यामुळे त्यांची माहिती देणे आम्हास भागच आहे. सांप्रत गोष्ट इतक्या थराला जाऊन पोहोचली आहे की आधुनिक माणूस धर्माच्या नावाखाली कर्मकाण्ड व कथा-कीर्तन यांतच गढून गेला आहे. दर्शन तर फारच मागे पडले आहे.

म्हणून आपणास त्या दार्शनिक गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. आज विज्ञानाने जरी प्रकृतीवर विजय मिळविलेला असला तरी माणूस प्रकृतीकडून पराभूत झालेला आहे. आज माणसाने आपल्या बुद्धीच्या बळावर विज्ञानाचा उपयोग करून अणुशक्ती निर्माण केली आहे परंतु तिचा उपयोग कशा तऱ्हेने करावा यावर तो नियंत्रण करू शकलेला नाही. माणसाच्या शरीर-प्रकृतीवर, मानवी संस्कारांवर विज्ञानाचे अजिबात नियंत्रण नाही. उलटपक्षी धार्मिक माणूस कर्मकाण्ड, कथा-कीर्तन व मूर्तिपूजा यांपुरते स्वतःला मर्यादित ठेवून कालक्रमणा करीत आहे. परंतु आपले अंतिम उद्दिष्ट मुक्ती आहे, म्हणजे या जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्त होऊन आपण अन्य एखाद्या श्रेष्ठ लोकात निवास करणार आहोत, हे काही तो जाणत नाही. आजचा वैज्ञानिक ही गोष्ट मानावयास तयारच नाही.

## धर्म व विज्ञानाचा समन्वय

सुखाचे साधन बनू शकतील अशा किती तरी वस्तू विज्ञानामुळे आम्हास मिळाल्या आहेत, मिळत आहेत व भविष्यातही मिळतील. परंतु साधनांचाही लाभ घेणारा कोण? हा प्रश्न मुख्य आहे. जोपर्यंत या गोष्टीकडे आपण लक्ष देणार

नाही तोपर्यंत आपणास खरे सुख मिळणे शक्य नाही. विज्ञानाने या गोष्टीकडे लक्ष दिलेले नाही व या पुढेही देऊ शकणार नाही. आज पदार्थविज्ञान (Physics) आणि जीवनदर्शन (Methaphysics) दोन्ही वेगवेगळे विषय झाले आहेत. आता आपणास हे दोन्ही विषय एक केले पाहिजेत कारण या उभयतांशी आपला घनिष्ठ संबंध आहे या उभयतांच्या विचारप्रणालींमध्ये ज्या त्रुटी आहेत त्या काढून टाकणे हा पहिला प्रयत्न समन्वयासाठी आपण करावयास हवा. आनंदाची गोष्ट आहे की, या त्रुटी दूरही होऊ लागल्या आहेत. आज सृष्टीचे अधःपतन होत असलेले आपण पाहात आहोत, तंटे बखेडे बळावत आहेत, माणसाची विकारी प्रवृत्तीही वाढत चालली आहे. काम, क्रोध इत्यादी विकारांनी माणूस अधिकाधिक ग्रस्त होत चालला आहे आणि तरी देखील त्याची तृप्ती होत नाही. अमेरिकेसारखे संपन्न देश व पश्चिमी राष्ट्रे भारताकडे आशाळभूतपणे डोळे लावून बसली आहेत. कारण त्यांना वाटते की भारताची जी आध्यात्मिक प्रवृत्ती आहे ती अखिल विश्वाचा उध्दार करू शकेल. तेव्हा सध्या धार्मिक मतांनी जे संकीर्ण स्वरूप धारण केले आहे ते काढून टाकून त्यांना एका शुद्ध, सरळ व जीवनोपयोगी स्वरूपात जनतेच्या समोर प्रस्तुत करणे याची आता नितांत आवश्यकता आहे.

आपण ही गोष्ट लोकांना सांगावयास हवी की, परमात्मा जो आहे, जसा आहे आणि आत्माही जो आहे, जसा आहे त्याच स्वरूपात त्यांची अनुभूती होऊ शकते. परंतु त्यासाठी ज्ञान हवे आणि या ज्ञानाद्वारेच आपण आपल्या कर्मांना एक योग्य दिशा दाखवू शकतो. कोणी रामाला मानले, कोणी श्रीकृष्णाला मानले तर कोणी कुराणाला याच प्रकारे विज्ञानही एखादा सिद्धांत शाश्वत आहे असे मानत नाही. ते जाणते की माणूस हा अपूर्ण आहे व हे सर्व सिद्धांत माणसानेच मांडलेले आहेत तेव्हा त्यांत चुका होण्याचा संभव आहे.

आज कोठे अतिवृष्टी होते तर कोठे अनावृष्टी. याचे कारण म्हणजे प्रकृतीही आपला धर्म सोडते आणि याचेही मुख्य कारण हे आहे की प्रथम माणूस आपला धर्म सोडतो. लांबलचक रूपात अतिशय कठीण श्लोकांच्या रूपात धार्मिक सिद्धांत प्रस्तुत करण्याची गरज नाही, तर ते सुटसुटीत व तर्कशुद्ध स्वरूपात

लोकांपुढे ठेवणे आवश्यक आहे. काम, क्रोधादी विकारांशिवाय सृष्टी कशी काय चालू शकेल? असे आज लोक विचारतात. आजच्या माणसाच्या विकृत मेंदूतूनच हा विचार बाहेर पडला आहे ही त्याची चूक आहे, हे उघड करून आपण लोकांस सांगावयास हवे की हे दूषित विचार त्यांनी काढून टाकावेत.

आपल्या आजच्या जीवनाशी निगडित राहील असे धर्माचे स्वरूप आपण ठेवावयास हवे. आता धार्मिक जीवन व्यतीत केल्यास मृत्यूनंतर भविष्यात आपण लाभ उठ्वू ही गोष्ट आजचा माणूस मानावयास तयार नाही, तो प्रत्यक्ष फळ पाहू इच्छितो. त्याला आपण ही गोष्ट नीट समजावून दिली पाहिजे की, काम, क्रोधादी मनोविकार हे काही आपले मूळ गुण नव्हेत, उलट सर्व धर्मांचे आत्मे हे प्रेम, आनंद, सुख व शांतीचेच इच्छुक असतात व वास्तविक तोच आपला मूळ धर्म आहे. आता आपण लोकांना धर्माचे असे स्वरूप सांगावयास हवे की, त्यांनी अशा पद्धतीने वागावयास पाहिजे. उदाहरणार्थ, खरे बोलावे. त्यांना आपण हेही सांगावयास हवे की, खरे बोलण्याकरिता शक्ती कशी मिळते. खोटे नका बोलू, खरे बोला असे आज सर्वच सांगतात. जर आपण त्यांना विचाराल की, आपण का नाही खरे बोलत. त्यावर ते म्हणतील की आमच्यांत शक्ती नाही आणि आजच्या समाजाकडे पाहून ते असेही म्हणतात की, त्यात आमचा काही फायदा नाही. त्यांना 'खरे बोलणे चांगले' याऐवजी हे समजावून द्यावयास हवे की, खरे बोलणे आपणास लाभदायक आहे, खरे बोलण्याने तुमच्यात शक्ती येईल. जर अशा रीतीने आपण धर्माचे ज्ञान देऊ आणि विज्ञानाचा धर्माशी समन्वय करू तर मानवमात्राचे निश्चित कल्याण होईल.

# समन्वय

वास्तविक 'धर्म' या शब्दाचा अर्थ आहे 'धारणा' किंवा स्वरूप. म्हणून धर्म हा शब्द माणसाला स्व-रूपात स्थित होण्याचे मार्गदर्शन करणाऱ्या अथवा दिव्य गुणांची धारणा करावयास शिकविणाऱ्या ज्ञानाचा बोधक आहे. अशा तऱ्हेने, माणसाचा आत्मा उन्नत करणे व त्याचे मन शुद्ध करणे हे धर्माचे क्षेत्र होय. दुसरीकडे विज्ञान माणसाला भौतिक जगाचा सैद्धांतिक तसेच प्रयोगात्मक परिचय करून देते. धर्म माणसाला शांतीसाठी आवश्यक आहे, त्याच्या मनाचा समतोलपणा कायम राखण्यासाठी सहाय्यक आहे, तर विज्ञान माणसाला भौतिक सौख्य उपलब्ध करून देते. अशा तऱ्हेने, दोन्ही आपापल्या परीने महत्त्वपूर्ण व उपयुक्त आहेत. परंतु विज्ञानावर धर्माचा अंकुश असणे आवश्यक आहे, यात मुळीच संशय नाही. अन्यथा विज्ञान विध्वंसक बनण्याची दाट शक्यता आहे. ज्याद्वारे आत्म्याचा परमोत्कर्ष होऊ शकेल त्या शाश्वत धर्माची स्थापना परमपिता परमात्मा आता करीत आहे. त्याचा आपण संपूर्ण लाभ घ्यावयास हवा.